www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 308 मंगळवार दि. 22 जुलै २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# अन्य कंपन्यांना वितरण परवाने मिळाल्यास महावितरणला फटका बसणार

## महावितरणची वीज अन्य वीज कंपन्यांपेक्षा महागडी

मुंबई : महावितरणची वीज देशातील अन्य राज्यांपेक्षाच नव्हे, तर राज्यातील अन्य खासगी वीज कंपन्यांपेक्षाही खूपच महागडी आहे. खासगी कंपन्यांनी राज्यभरातील महावितरणच्या कार्यक्षेत्रात वीज वितरण परवाने देण्याची मागणी राज्य वीज नियामक आयोगाकडे केली असून ते मिळाल्यास महावितरणचे अनेक बडे ग्राहक स्वस्त वीजेसाठी या कंपन्यांकडे वळण्याची शक्यता आहे. त्यामुळे महावितरणला मोठी व्यावसायिक स्पर्धा करावी लागणार असून मोठ्या ग्राहकांसह घरगुती ग्राहकही गमावल्यास मोठा फटका बसण्याची भीती आहे. महावितरणच्या पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यातील काही परिसर, नागपूर आदी महावितरणच्या बहुतांश कार्यक्षेत्रात टाटा, टोरेंट, अदानी या वीजकंपन्यांनी तर महावितरणने मुंबईतील बहुतांश क्षेत्रात वीज वितरणाचे परवाने देण्याची विनंती करणाऱ्या याचिका आयोगापुढे दाखल केल्या आहेत. या याचिकांवर मंगळवारपासून सुनावणी सुरु होणार आहे. महावितरणवर सुमारे ४८ लाख कृषी ग्राहकांच्या वीजपुरवठ्याची जबाबदारी असून त्यांच्याकडे सुमारे ७५ हजार ५८८ कोटी रुपयांची




थकबाकी आहे. कृषी ग्राहकांना अतिशय स्वस्त दराने वीजपुरवठा केला जातो, मात्र महसूल मिळत नसल्याने आणि थकबाकीमुळे महावितरणची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यातच आयोगाने अन्य वीज कंपन्यांना राज्यभरात परवाने दिल्यावर महावितरणला मोठ्या व्यावसायिक स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. आयोगाने चालू आर्थिक वर्षासाठी बेस्ट, अदानी, टाटा व महावितरणचे वीजदर ठरवून दिले असून त्याचा आढावा घेतल्यास घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक अशा सर्वच संवर्गातील ग्राहकांसाठीचे महावितरणचे वीजदर आणि अन्य कंपन्यांचे वीजदर यात खूप मोठी तफावत आहे. महावितरणची वीज अन्य वीज कंपन्यांपेक्षा महागडी असून वाणिज्यिक ग्राहकांचे दर ५०-१०० टक्के अधिक, उद्योगांचे वीजदर ३०-४० टक्के अधिक, तर घरगुती ग्राहकांसाठीचे वीजदरही ५०-८० टक्के अधिक आहेत. त्यामुळे महावितरणच्या क्षेत्रात अन्य वीज कंपनीला वितरण परवाना मिळाल्यावर स्वस्त वीज दर आणि महावितरणच्या तुलनेत दर्जेदार सेवा मिळत असल्यास ग्राहक साहजिकच अन्य कंपन्यांकडे वळणार आहे. त्यामुळे आगामी काळात महावितरणपुढे अस्तित्वाचे मोठे आव्हान उभे राहणार आहे.

# बँक राष्ट्रीयकरण दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : सी.के.टी. महाविद्यालय, नवीन पनवेल,अर्थशात्र विभाग व बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबई (ए.आय. बी.ई.ए.) यांच्या संयुक्त विद्यमाने एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबईचे अध्यक्ष अरविंद मोरे उपस्थित होते. या कार्यशाळेला महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. काकासाहेब ढवळे, प्रा. हरिभाऊ खरात, डॉ. काळुराम ढोरे आणि शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेलच्या प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी अरविंद मोरे म्हणाले की, बँक राष्ट्रीकरण एक मोठी अर्थक्रांती होती. भारतातील बँकांचे राष्ट्रीयकरण ही एक परिवर्तनकारी घटना होती ज्याने भारतीय बँकिंग उद्योगात फार मोठा बदल झाला. आज जी काही देशाची प्रगती झाली आहे. त्यात बँक राष्ट्रीयीकरणाची महत्वाची भूमिका आहे. बँकांचे राष्ट्रीयकरण म्हणजे बँका सरकारी मालकीच्या असणे होय. ते पुढे म्हणाले की, सर्वप्रथम १९४९ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. त्यानंतर १९ जुलै १९६९ रोजी १४ बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.हे देशातील पहिले आणि सर्वातमोठे बँकांचे राष्ट्रीयकरण होते. हा देशहिताचा महत्वपूर्ण निर्णय तेव्हाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी घेतला होता. ह्या बँक राष्ट्रीयीकरणाचे फायदे अजूनही भारतीय जनता मोठ्या आनंदाने घेत आहे. त्यानंतर दुसरे राष्ट्रीयकरण १५ एप्रिल १९८० मध्ये ६ बँकांचे करण्यात आले. अरविंद मोरे म्हणाले पुढे म्हणाले की, हे केवळ बँक राष्ट्रीयकरण नसून हे खऱ्या अर्थाने ही अर्थक्रांतीच्या दिशेने राष्ट्रहितासाठी उचलेले मोठे पाऊल होते. बँक राष्ट्रीयीकरणामुळे ग्राहकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि बँकिंग सेवा सुधारण्यास मदत झाली. बँक




राष्ट्रीयीकरणामुळे बँकांनी ग्रामीण भागात विस्तार करण्यास सुरुवात केली. यामुळे अर्थव्यवस्थेचाही विस्तार झाला आणि देशाच्या दुर्गम भागातही रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर सुरु झालेल्या प्राधान्य क्षेत्र कर्ज योजनेमुळे कृषी आणि संबंधित क्षेत्रे राष्ट्रीय उत्पन्नात सर्वात मोठे योगदान देणारे म्हणून उदयास आली. बँक राष्ट्रीयीकरणामुळे लोकांच्या बचतीला मोठ्या प्रमाणात एकत्रित करण्यास आणि त्याचा उत्पादक हेतूंसाठी वापर करण्यास मदत झाली. गरीब आणि गरजू लोकांना कर्ज मिळणे सोपे झाले.बँकिंग क्षेत्रात सरकारी नियंत्रण वाढल्याने आर्थिक स्थैर्य आले.

# सावता परिषदेच्या जिल्हा सचिव पदी आनंदवाडी, सराटेवडगाव चे सरपंच भिमराव बोडखे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**
**माळी समाजाच्या** न्याय व हक्कासाठी लढणा-या सावता परिषदेच्या बीड जिल्हा सचिव पदी आनंदवाडी सराटेवडगांव ग्रामपंचायत चे कर्तव्यदक्ष सरपंच भिमराव बोडखे यांची संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष किशोर राऊत यांनी जिल्ह्याची कार्यकारणी करून जिल्हा सचिव पदाची जबाबदारी सरपंच भिमराव बोडखे यांच्याकडे सोपवल्याबद्दल



त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या आनंदवाडी सराटेवडगांव गावामध्ये भव्य नागरी सत्कार शुक्रवारी करण्यात आला. सावता परिषद महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा सचिव पदी सरपंच भिमराव बोडखे यांची निवड झाल्याबद्दल कर्तव्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप भाऊ सुंबरे, शिवदास नन्नवरे ग्रा.पं. सदस्य, राहुल गजघाट ग्रा.पं. सदस्य, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष संजय तरटे, उपाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, सेवानिवृत पोस्ट विभाग प्रमुख शरीफ पठाण, सेवा सहकारी सोसायटी चे व्हॉईस कोंडीभाऊ झांबरे, माजी ग्रा.पं. सदस्य विजय बोडखे, नबी शेख, बाळकृष्ण तरटे, सिद्धेश्वर शेळके, अर्जुन बोडखे, वनसिंग बोडखे, मल्हारी बोडखे, पांडू शिंदे, अशोक बोडखे, ईमाम शेख, प्रभाकर बोडखे, रामदास बोडखे, प्रवीण सुंबरे, रमेश बोडखे, दिपक झांबरे, महादेव बोडखे, शिवाजी झांबरे, अप्पासाहेब बोडखे आदि युवक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# ग्रामस्थांच्या नुकसानीपोटी ११३ कुटुंबियांना करण्यात आले सिडको तर्फे धनादेशाचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
ग्रामस्थांच्या नुकसानीपोटी ११३ कुटुंबियांना करण्यात आले सिडको तर्फे धनादेशाचे वाटप खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांच्या सूचनेनुसार व पनवेल चे तहसीलदार विजय पाटील यांच्या प्रयत्नाने करण्यात आले. मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या सूचनेनुसार सिडको नवी मुंबई यांना सुचित करण्यात आले होते. त्यानुसार मौजे पारगाव डुंगी या गावाला तहसीलदार विजय पाटील यांच्या प्रयत्नानुसार तसेच सदस्य जिल्हा विकास समन्वय व स नियंत्रण समिती दिशा तथा पारगावच्या माजी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांच्या पाठपुराव्याला यश येऊन मौजे दूंगी येथे धनादेशाचे वाटप करण्यात आले. दरवर्षी पावसाळ्यात पुराच्या पाण्यामुळे ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात बांधकामाचे तसेच सामानाचे नुकसान होत आहे. चार महिन्याचे स्थलांतरा होण्यासाठी



सदर नुकसानापोटी सिडको महामंडळ तर्फे ग्रामस्थांना चार महिन्याच्या स्थलांतरिता होण्यासाठी घर बऱ्यापोटी 50 हजार रुपये दिले जातात. सदर धनादेश तहसीलदार पनवेल यांच्या कार्यालयामार्फत आज ग्रामपंचायत पारगाव येथे ११३ कुटुंबाना वाटप करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी संतोष ठोंबरे, ग्रामसेविका सौ वानखेडे, माजी उपसरपंच निशा पाटील, मनोज दळवी, तलाठी क्षमा पवार, बाळासाहेब नाईक, प्रमोद नाईक, पोलीस पाटील श्रीधर पाटील व ग्रामपंचायत कार्यालयातील क्लार्क प्रमोद म्हात्रे उपस्थित होते.

# धर्माच्या नावाखाली कोणतीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही,- माजी खा. किरीट सोमय्या



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
धर्माच्या नावाखाली कोणतीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, कायदा व सुव्यवस्था पाळलीच पाहिजे, असे ठाम मत भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवारी पनवेल दौऱ्यादरम्यान व्यक्त केले. अनधिकृत भोंग्यांमुळे वाढणाऱ्या ध्वनीप्रदूषणावर आणि नागरिकांच्या नाराजीवर त्यांनी चिंता व्यक्त करत प्रशासनाने या संदर्भात ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली. महाराष्ट्र भोंगा मुक्त मोहिमेला गती देण्यासाठी किरीट सोमय्या यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत पनवेलचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे, कळंबोली पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते आणि तळोजा पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांची भेट घेत शहरातील अनधिकृत भोंगे हटवण्याची मागणी केली. किरीट सोमय्या यांच्या मागणीला पोलिसांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, येत्या आठ दिवसांत कारवाई करून अनधिकृत भोंगे बंद करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकुर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, बबन मुकादम, गुरुनाथ गायकर, कळंबोली शहर मंडळाचे माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, मंडल उपाध्याक्ष किरण पाटील, निर्दोष केणी, अमर उपाध्याय, वासुदेव पाटील, कीर्ति नवघरे, शैलेंद्र त्रिपाठी, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



## शिक्षकांना BLO कामातून मुक्त करण्याची राज्य शासनाकडे मागणी

### 'हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन' कडून मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना साकडे; शाळांतील अध्यापनावर परिणाम होतोय- शेख अब्दुल रहीम

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर:**



राज्यातील शाळांतील प्राथमिक शिक्षकांना BLO (बूथ लेव्हल ऑफिसर) कामकाजातून तात्काळ मुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय, मुंबई येथे देण्यात आलेल्या निवेदनात शाळांतील शिक्षकांकडून सतत BLO काम घेतल्याने शैक्षणिक गुणवत्ता ढासळत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. या मागणीसाठी संबंधित निवडणूक विभागाचे प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी मा. एस. चोक्कलिंगम साहेब (भा.प्र.से.)तसेच उपसचिव तथा सह-मुख्य निवडणूक अधिकारी मा. श्री. मनोहर पारकर साहेब यांना भेटून सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले. तसेच वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आले आहे. शासकीय धोरणानुसार शैक्षणिक व अशैक्षणिक कामांचे वर्गीकरण करून बीएलओचे काम अशैक्षणिक असल्याचे धोरण ठरविण्यात आले असून देखील अद्याप शिक्षकांना बीएलओचे कामातून कार्यमुक्त करण्याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्याने शेख अब्दुल रहीम सर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस साहेबाकडे सुद्धा थेट पाठपुरावा केला आहे. शिक्षक BLO कामात गुंतल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व शाळेतील शैक्षणिक प्रगतीवर गंभीर परिणाम होत आहे. शिक्षकांकडून BLO काम घेण्याऐवजी प्रशासकीय कर्मचारी नियुक्त करावेत, अशी ठाम भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

यासंदर्भात शिक्षण व निवडणूक विभागांच्या अधिकाऱ्यांनाही यापूर्वीही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. तरीही अद्याप योग्य तो निर्णय न झाल्यामुळे शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व शिक्षकांना BLO कामातून कायमस्वरूपी मुक्त करावे, अशी मागणी शेख अब्दुल रहीम सर यांनी पुन्हा केली आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री कार्यालयासह शिक्षण विभाग व मुख्य निवडणूक अधिकारी तसेच इतर सर्व शासकीय व प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहे. आता यावर संबंधित यंत्रणा काय निर्णय घेतात याकडे सर्व शिक्षकांचे लक्ष लागले आहे...

## पाण्याच्या टाकीच्या बाजूला खड्डा त्वरित दुरुस्त करावा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी प्रविणभाऊ पवार**

खार पुर्व विभाग पाईप लाईन (संत ज्ञानेश्वर रोड) मार्ग मराठा कॉलेनी सांताक्रूझ व निर्मलनगर वांद्रे दिशेला जाणाऱ्या दिशेने जाणाऱ्या हुसेन टेकडी ठिकाणी च्या बरोबर तीन रोडच्या मध्यभागी जलवाहिनीच्या वालाची टाकी बांधण्यात आलेली आहे. या पाण्याचा टाकी शेजारी एक मोठा खड्डा पडला आहे. त्याचबरोबर या जलवाहिनी टाकीचे लोखंडी झाकण पण दबलेले दिसत आहे. भविष्यात हा लहान दिसणारा खड्डा मोठा होऊन मोठी जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे जलवाहिनीच्या टाकीवरील लोखंडी पत्रा वाहण्याच्या सतत ये जा मुळे त्यांच्या वजनामुळे मोडकळीस येऊ शकतो. या कारणांमुळे पाण्याच्या टाकीवर एच. पुर्व. महानगरपालिका विभागाने बऱ्याच दिवसांपासून या टाकीवर एक बॅरेक लावले दिसत आहे. या रोडच्या आजूबाजूला रोजच दोन व चार चाकी वाहनांची सतत वर्दळ चालू असते. त्यामुळे तेथे केव्हाही अपघात होण्याचा संभव आहे. सदर जागेवर टाकीच्या वरील झाकणाचा पत्रा व उद्भवलेला खड्डे लवकरात लवकर दुरुस्त करुन तो रस्ता पुर्वी प्रमाणे मोकळा करावा.




# करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा वाढदिवस साजरा

### रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

करंजाडे ग्रामपंचायतीचे कार्यसम्राट व लोकप्रिय माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा ५० वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करंजाडे येथे करण्यात आला. या निमित्त स्थानिक प्रकल्पग्रस्थ रिक्षा चालक संघटनेनी करंजाडे जिल्हा परिषद शाळेत गरजू विद्यार्थ्यांसाठी वाह्यांचे वाटप केले. खरतर समाजात रिक्षा वाले म्हटले की अरेरावी दादागिरी करणारे अशी प्रतिमा त्यांची असते. परंतु या उपक्रमातून त्यांच्यातील माणूस आणि माणुसकी दिसून येते असे प्रतिपादन रामेश्वर आंग्रे यांनी केले या वाढदिवसा निमित्त भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजप नेते संदीप पाटील, सुनील बहिरा, गजानन पाटील, अंकुश नाईक, संतोष पवार, माजी सरपंच बळीराम म्हात्रे, ग्राम पंचायत माजी सदस्य मंगेश बोरकर, भरत राणे, निलम भगत, विद्यमान सदस्य आतिश साबळे, तुषार नागे, पोलिस पाटील कुणाल लोंढे भाजपचे कार्यकर्ते



सुरेश भोईर, माणिक गायकर, संतोष भोईर, संदीप नागे, चंद्रकांत आंग्रे, रमेश आंग्रे प्रकल्पग्रस्त रिक्षा संघटना अध्यक्ष अशोक विखारे यांच्या सह पदाधिकारी तसेच विविध सोसायटींचे पदाधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळ्याचे आयोजन करंजाडे सामाजिक , सांस्कृतिक व शैक्षणिक विकास मंडळ यांनी व पदाधिकाऱ्यांनी केले होते. या निमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर चे आयोजन केले होते. नागरिकांनी याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. करंजाडे मधील जेष्ट नागरिक संघटनांनी रामेश्वर आंग्रेंचा सुवर्ण महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा साजरा करून त्यांना आशीर्वाद दिले. आम्हाल विठुरायांची पंढरी आंग्रे यांनी दाखवली त्यामुळे सप्रेम भेट म्हणून विठ्ठल रुखमिनीची प्रतिकृती असलेली मूर्ती त्यांना दिली. करंजाडे सामाजिक सांस्कृतिक व सामाजिक विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आधारकार्ड शिबिर त्याच बरोबर १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होत या गुणगौरव सोहळ्यात विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनी मोठ्या पर्यंत उपस्थित राहून सहभाग घेतला. "समाज सेवेचा वारसा आणि जन सेवेचा वसा" घेत समाजाचे काही तरी देणे लागतो आणि तीच भावना ठेऊन रामेश्वर आंग्रे यांनी वाढदिवसा निमित्त समाजातील प्रत्येक वर्गातील नागरिकांसाठी विविध उपक्रम ठेवले होते आणि म्हणून जेष्ठां पासून ते तरुणान पर्यंत सर्वांचे आशीर्वाद रामेश्वर आंग्रे याना लाभले करंजाडे सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक विकास मंडळ व त्यांचे पदाधिकारी यांच्या मार्फत करंजाडे नागरिकांना विविध सण उपक्रम यांच्या मार्फत वेगवेगळी पर्वणी ते देत असतात मग ते दहीहंडी असो करंजाडे मोहत्सव नवरात्र उत्सव आरोग्य शिबिर असो किंवा जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे पाणी पुरवठा किंवा रस्ते समस्या विविध समस्या साठी आंदोलने उभे करून रामेश्वर आंग्रे यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले आहे. आणि म्हणून कार्यक्रम जनसेवक सरपंच म्हणून आजही नागरिकांच्या मनावर राज्य करीत आहेत

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कै रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालय पिलीव मध्ये विद्यार्थी मेळाव्यात निर्भया पथकाचे मार्गदर्शन"



**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर)**

माळशिरस तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील व कै रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थी मेळाव्याचे तसेच वृक्षारोपणाचे आणि निर्भया पथकाचे मार्गदर्शन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली सौ लक्ष्मीवहिनी यांचे प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर नूतन प्राचार्य अशोक बागल यांनी आपल्या शाखेचा लेखाजोखा सांगत आपले मौलिक विचार विद्यार्थी विद्यार्थिनी समोर व्यक्त करून उद्‌बोधक अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. तर अकलूज निर्भया पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक वनडे मॅडम यांनी किशोरवयीन मुला-मुलींना मोबाईलचा वापर कसा व किती करावा हे मार्गदर्शनातून संगत असताना आपण निर्भयतेने वागले पाहिजे आणि त्यामध्ये काही अडचणी आल्यास आपण खंबीरपणे व आत्मविश्वासाने राहून व आपल्या हातून कोणतीही चूक होणार नाही याची दक्षता घेऊन तुम्ही आमच्याकडे कोणतीही तक्रार नोंदवा आम्ही तुमच्या पाठीशी निश्चितपणे कोणत्याही वेळी तयार आहोत. असे सांगून आपला हक्क आपण आबादित ठेवला पाहिजे अशी सूचनाही केली तसेच श्री घाडगे यांनी सुद्धा मुला मुलींना अनेक उदाहरणे देऊन एक आत्मविश्वास निर्माण केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटक हर्षवर्धन ठोंबरे रणजीत वाघमोडे पांडुरंग गोरे प्रसाद सूर्यवंशी त्याचप्रमाणे राष्ट्रवादी अजित पवार काँग्रेस पक्षाच्या पिलीव शाखेच्या महिला अध्यक्ष पूनम ताई भैस, सेवानिवृत्त आदर्शअध्यापिका व सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त आणि प्लास्टिक बंदी च्या प्रचारक सौ. केडी सातपुते मॅडम, व्यवस्थापन समितीचे संचालक व पत्रकार संजय पाटील, पत्रकार संघाचे दामोदर लोखंडे, रघुनाथ देवकर ,प्रमोद भैस, अतुल नष्टे, सुजित सातपुते, डॉ. निलेश कांबळे, अंकुश भैस व सर्व शिक्षक स्टाफ आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. त्याच वेळी प्रशालेच्या समोर वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचालन झाडे सर, तर आभार भंडारे सर यांनी मानले.

## खार अष्टविनायक महिला गोविंदा पथकांची उंच भरारी

( व्यवस्थापन:अमित ब्रिद )

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी : प्रविणभाऊ पवार**

मुंबई खार पुर्व साईबाबा मंदिर, साईबाबा एस आर ए बिल्डिंग विभागातील अष्टविनायक गोपिका गोविंदा पथक यंदा पंधराव्या वर्षात पदार्पण करत आहे. वांद्रे, खार, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई विभागात मधिलांचा प्रथमच गोविंदा पथक सुरू करण्यात आला आहे. मंडळ स्थापन करण्यापूर्वी विभागातील सर्व वरिष्ठांच्या विचाराने आणि आशीर्वादाने पहिल्या वर्षापासून हिंदू सण - संस्कृती जपण्याचा अ ष्ट वि ना य क गोपिका गोविंदा पथक आहे. यावर्षी मंडळ पंधराव्या वर्षात पदार्पण करत आहे.




खार वांद्रे सांताक्रुज मधील प्रथम महिलांचे गोविंदा पथक सुरू करण्यात आले, सर्व विभागातील वरिष्ठांच्या विचाराने व आशीर्वादाने पहिल्या वर्षापासून हिंदू सण - संस्कृती जपण्याचा प्रयत्न या महिला गोविंदा पथकाने करण्यात आला.

गेली अनेक वर्ष विभागातील त्याचप्रमाणे मुंबई मधील नामांकित दही कला उत्सवात मानाच्या हंडीचा मान मिळवला त्याचप्रमाणे मागील वर्षात अष्टविनायक गोपिका गोविंदा पथकाने मुंबईत नव्हेच तर पुणे मधील मानाच्या दहीहंडी फोडण्याचा मान सुद्धा मिळवण्यात आला आहे. कोल्हापूरमध्ये झालेल्या स्पर्धेत अष्टविनायक महिला गोपिका गोविंदा पथकाने "प्रथम क्रमांक" पटकावून वांद्रे, खार, सांताक्रुज विभागात या मंडळाच्या महिला पथकांनी आपला ठसा उमटवून महिला सक्षमीकरणाचा उत्तम असा संदेश कोल्हापूरकरांना दिला आहे. अष्टविनायक गोपिका गोविंदा पथकाचे एकच उद्दिष्ट एकच आहे की, नारीशक्ती ची ताकद ही काय आहे त्याचे महत्त्व जनतेला पटवून देणे. मंडळाचे प्रमुख व्यवस्थापक युवा नेता अमित ब्रिद यांनी विभागातील नागरिकांना आवाहन केले आहे की, आपण आपल्या मुलीला, बहिणीला, आमच्या या महिला गोविंदा पथकाचा एक गोविंदा पट्टू म्हणून सहभागी करुन घ्यावा, आपल्या विभागाच्या नाव सर्वत्र महाराष्ट्रभर या गोविंदाच्या माध्यमातून आपण सर्वांनी मिळून सर्वत्र पोहोचवूया. असे त्यांनी सांगितले.

## मानवी हक्क संरक्षणाची मशाल आता गाव-खेड्यांपर्यंत! फेडरेशनच्या नव्या फळीची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

मानवी हक्कांचे संरक्षण आणि त्यांचा व्यापक प्रसार हे ध्येय घेऊन अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या मानवी हक्क संरक्षण फेडरेशनने आता आपली संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत केली आहे. पनवेल येथील त्यांच्या मुख्य कार्यालयात एका दिमाखदार सोहळ्यात फेडरेशनच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी नव्या, कार्यक्षम पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली. यामुळे मानवी हक्कांची मशाल आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर कच्छी यांच्या उपस्थितीत हा नियुक्ती सोहळा पार पडला. यावेळी नियुक्तीपत्रे



स्वीकारताना, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर सामाजिक कार्याची निष्ठा आणि उत्साह स्पष्ट दिसत होता.

या महत्त्वाच्या नियुक्त्यांमध्ये महाराष्ट्र राज्य प्रभारी पदी शिराज तांबोळी, महाराष्ट्र राज्य सचिव पदी निलेश भगत, आणि महाराष्ट्र महिला अध्यक्ष पदी रत्नप्रभा गोमासे यांच्याकडे राज्याची धुरा सोपवण्यात आली आहे.

फेडरेशनने केवळ राज्य पातळीवरच नाही, तर जिल्हा आणि तालुका स्तरावरही मजबूत नेतृत्व दिले आहे. रायगड जिल्हा अध्यक्ष पदी विजय खेडकर, पनवेल तालुका महिला प्रभारी नेहा किरनळी, नवी मुंबई महिला अध्यक्ष पदी शबाना शेखसन, पनवेल शहर अध्यक्ष पदी आशिष मोहोकर, शहर उपाध्यक्ष पदी प्रदीप मिसाळ, खालापूर तालुका महिला अध्यक्ष पदी इशिका शेलार, तर कार्यालयीन प्रमुख पदी सूरज नागे यांची नियुक्ती करण्यात आली.

या सोहळ्याला राष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी राज सदावर्ते आणि स्वप्ना रॉय यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना, फेडरेशनच्या नेतृत्वाने स्पष्ट केले की, या नियुक्त्यांमुळे प्रत्येक जिल्हा, तालुका आणि शहरात सदस्य मोहीम अधिक वेगाने राबवता येईल. विशेषतः महिलांसाठी स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, ज्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडेल.

मानवी हक्कांचे संरक्षण आणि समाजाच्या वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी फेडरेशनचे हे नवे नेतृत्व निश्चितच महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, अशी अपेक्षा आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित दादा पवार गटाचे युवक प्रदेश अध्यक्ष सुरेश चव्हाण यांच्यावर गुन्हे दाखल करा !

### उदगीर छावा संघटना ग्रामीण जिल्हाअध्यक्ष दत्ता पाटील यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंग**

20/ 7 / 2025 रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष माननीय सुनील तटकरे यांचा लातूर दौरा असल्याची माहिती अखिल भारतीय छावा संघटना महाराष्ट्र राज्य यांना मिळताच छावा संघटनेचे तरुण तडफदार शेतकरी नेते विजयकुमार घाडगे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक मुद्दे घेऊन न्याय मागण्यासाठी लातूर जिल्हा दौऱ्यावर असणारे माननीय सुनील तटकरी साहेब हे लातूर येथील शासकीय विश्रामगृह पत्रकार परिषद घेत असताना विजयकुमार घाडगे पाटील यांनी त्या ठिकाणी जाऊन महाराष्ट्राचे कृषिमंत्री मा. माणिकराव कोकाटे साहेब हे विधिमंडळ चालू असताना ऑनलाइन रम्मी खेळ खेळत आहेत असे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित दादा पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष माननीय सुनीलजी तटकरे साहेब यांना देण्यात आले व त्यांच्या ठिकाणी माजी . क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे सुद्धा हजर होते व शेतकऱ्यांच्या हित्तासाठीच्या अनेक मागण्या कृषीमंत्र्यांनी मंजूर कराव्यात या मागणीचे निवेदन छावा संघटनेचे शेतकरी नेते विजकुमार घांडगे (पाटील) यांनी दिले



व हॉल बाहेर येताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा अजितदादा गटाचे युवा प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण व त्यांच्या काही गाव गुंडांनी निवेदन देण्यात आलेल्या घाडगे पाटील यांना लाता बुक्क्याने बेदम व विश्रामगृहातील खुर्च्या फेकून जबर मारहाण केले असून सदर सुरेश चव्हाण यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावे अशे निवेदन उदगीर येथील अखिल भारतीय छावा संघटना ग्रामीण जिल्हाध्यक्ष दत्ता पाटील , उदगीर तालुका अध्यक्ष मनोज पाटील , उदगीर शहराध्यक्ष विजय पाटील, प्रा . राजेश चव्हाण , विशाल देवणे , सतीश पाटील , बालाजी भोसले , अंकुश ताटापले , व छावा संघटनेचे सर्व कार्यकर्ते यांनी माननीय उपजिल्हाधिकारी उदगीर यांना निवेदन देऊन तिव्र आंदोलन करणार असल्याचे सांगितले

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पंचायत समिती उरण शिक्षण विभागा कडून सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप समारंभ संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर**

उरण तालुक्यातील सन २०२४/२५ या वर्षांमध्ये सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक बंधू भगिनींसाठी पंचायत समिती शिक्षण विभाग यांनी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सौ निर्मला घरत मॅडम पंचायत समिती उरण कक्ष अधिकारी मान. श्री धाटावकर सर, पाच केंद्राचे केंद्रप्रमुख, श्री शंकर म्हात्रे सर , श्री बबन पाटील सर, श्री दर्शन पाटील सर, दिलीप पाटील सर, श्री प्रवीण पाटील सर पंचायत समिती कर्मचारी वृंद, सर्व सेवानिवृत्त शिक्षक बंधू भगिनी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक व तंत्रस्नेही शिक्षक उपस्थित होते. सुरुवातीला सेवानिवृत्त शिक्षक हभप श्री राजा पाटील सर यांनी गणरायाच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली



मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, गणरायाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर पंचायत समिती उरण गटशिक्षणाधिकारी सौ. निर्मला घरत मॅडम यांनी प्रास्ताविक सादर केले. प्रास्ताविकांमध्ये उरण तालुका शिक्षण विभागाचा हा शिक्षकांसाठीचा पहिलाच कार्यक्रम आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने राबवत आहोत. अनेक बंधू-भगिनींनी आपली सेवा या शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात केली त्यांचा सन्मान होणे. हा माझा मानस होता आणि तो सत्यात उतरवण्यासाठी पंचायत समिती व शिक्षक बंधू भगिनी यांनी सहकार्य करून आज हा कार्यक्रम होत आहे त्याबद्दल तालुक्यातील तमाम शिक्षक बंधू भगिनींचे मी अभिनंदन करते. या कार्यक्रमाला माननीय गट विकास अधिकारी श्री सर्जेराव पाटील सर यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले तसेच सर्व सेवानिवृत्त शिक्षक बंधू भगिनींना शुभेच्छा दिल्या तसेच उर्वरित सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांना देखील शैक्षणिक कार्याच्या शुभेच्छा प्रदान केल्या. तदनंतर सर्व सेवानिवृत्त शिक्षक बंधू भगिनींचा सत्कार समारंभ करण्यात आला त्यामध्ये खालील निरोप मूर्ती सहभागी होते.

१) श्री सतीश नारायण शेडगे विषय शिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोप्रोली
२) श्री.दिलीप शांताराम म्हात्रे उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंढरी
३) श्री. नरेश गजानन मोकाशी पद्वीधर रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धुतुम
४) श्री. सदानंद अंबाजी पाटील उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जासई ५) श्री. राजन लक्ष्मण ठाकूर विषय शिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेवे कोळीवाडा ६) श्री. हिराचंद सोमा म्हात्रे पद्वीधर रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीन शेवे ७) श्री. राजेंद्र दामोदर पाटील
उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंडेगाव ८) श्रीम. विजया भक्तराज म्हात्रे
उपशिक्षिका रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनारी ९) श्रीम. पुष्पलता महादेव ठाकूर
विषय शिक्षिका रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनारी १०) श्रीम. सुनंदा गणेश पाटील
उपशिक्षिका रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनारी ११) श्रीम. सुविधा अनिल म्हात्रे
पद्वीधर रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवघर
१२) श्रीम. अहिल्या रघुनाथ म्हात्रे उपशिक्षिका रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करळ १३)श्री. निळकंठ रामदास वर्तक उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रानवड १४)श्री.गोपाळ भाऊ जाधव केंद्रप्रमुख रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिर्ले १५) सौ उर्मिला रमेश म्हात्रे माजी केंद्रप्रमुख १६) श्री विलास हनुमंत गावंड उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद शाळा धाकटी जुई १७) श्री रविंद्र विनायक पाटील उपशिक्षक शाळा दादर पाडा १८) श्री चंद्रकांत रामदास गावंड उपशिक्षक शाळा दादर पाडा अशा एकूण अठराषशिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षकांमधून श्री नरेश मोकाशी सर,श्री राजा पाटील सर , सौ उर्मिला पाटील मॅडम व श्री गोपाळ पाटील केंद्रप्रमुख चिरले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख मान्यवर म्हणून श्री. धाटावकर सर कक्ष अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले शिक्षणासारख्या पवित्र ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचा आज गौरव करण्याचे मला भाग्य मिळाले असे गौरवोद्गार काढून सेवानिवृत्त व सेवेत असणाऱ्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला सहकार्य करणारे श्री महेश गावंड सर, श्री कौशिक ठाकूर ,श्री राजेश कोल्हे, श्री राजेश चोगले, सौ.अपर्णा पालकर,श्री संजय होळकर ,सौ नीलिमा म्हात्रे, श्री अनिल म्हात्रे, पंचायत समिती सौ योगिता पाटील मॅडम, नीलम म्हात्रे मॅडम, सौ सुचिता बोरसे मॅडम, श्रीमती शीतल पाटील व श्री सरगर यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महेश गावंड यांनी केले.

## सेलू तालुक्यातील गायरानधारकांच्या प्रश्नासंदर्भात एक दिवसीय धरणे आंदोलन.

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**

सेलू तालुक्यातील गायरानधारकांच्या प्रश्नासंदर्भात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. गायरानधारकाच्या नावे पिकपेरा व एक (ई) ला नोंद घेण्यात यावी व मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजने करिता गायराण जमिनी घेण्यात येऊ नये या प्रमुख मागण्या तहसीलदार श्री डॉ शिवाजी मगर यांच्याकडे केल्या आहेत. यावेळी परभणी जिल्हा काँग्रेस सरचिटणीस श्री मिलिंद सावंत,भीमशक्तीचे परभणी जिल्हाप्रमुख श्री सतीश भिसे, श्री पप्पूराज शेळके,कॉ रामकृष्ण शेरे,बालकिशन साळवे,अंकुश तांबे, आदिंची उपस्थिती होती.



## विंचूर येथे जुगार अड्डयावर पोलिसाचा छापा, सात जणांना अटक, ७४ हजाराचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचुर येथील इंदिरानगर परिसरातील पवार ट्रेडींग कंपणी येथे बेकायदेशीरपणे विनपरवाना सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर लासलगाव पोलिसांनी छापा टाकला. यामध्ये तीनपानी जुगार खेळणाऱ्या ७ आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल व मोटरसायकली व इतर साहित्य असा ७४ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सागर सुर्यभान आरोटे यांनी दिलेल्या



फिर्यादनुसार कलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.
याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, विंचूर इंदिरानगर परिसरातील पवार ट्रेडींग कंपणी येथे जुगार खेळत व खेळवित असल्याची गुप्त माहिती लासलगाव पोलिसांना मिळाली. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या सूचनेनुसार पथकाने त्याठिकाणी छापा टाकला. त्यावेळी तेथे अतुल लक्ष्मण धुमाळ, वय २३ वर्ष, दिपक सदू कुऱ्हाडे, वय ३२ वर्ष, लखन बाळु मोरे, वय २७ वर्ष तिघे रा.इंदिरानगर विंचुर, नितीन परशराम कांबळे, वय 32 वर्ष, रा.उशीर गल्ली विंचूर, मजर सलिम शेख, वय ३६ वर्ष, रा.शनि मंदिर विंचुर, दिपक दत्तु बोडके वय ४२ वर्ष,रा.निफाड रोड, विंचूर, चेतन वसंत कुलकर्णी, वय३५ वर्ष, रा.विंचूर हे तीनपानी नावाचा जुगार खेळत व खेळवित असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून ७४ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जाधव करीत आहे.

## पेण तालुक्यातील लाईटीचा खेळखंडोबा नागरिक त्रस्त..

**दैनिक युवक आधार**
**कपिल पाटील पेण प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारेपाट विभागात गेले कित्येक दिवस MSEB चे कर्मचारी विद्युत पुरवठा करण्यास असमर्थ ठरले आहेत.याचा जाब विचारता समाधानकारक उत्तर न मिळाल्याने नागरिकांनी स्थानिक आमदार मा. रवींद्रशेठ पाटील,नगराध्यक्ष प्रीतम ताई पाटील,प्रांत साहेब तसेच MSEB अधिकारी यांची भेट घेऊन लाईट वारंवार का जाते 65वर्षे जुन्या लाईनी कधी बदलणार कंडक्टर व ट्रान्सफॉर्मर यांची नियमित तपासणी करण्यासाठी कर्मचारीची व्यवस्था होणार का आशा वेगवेगळ्या विषयावर चर्चा करण्यात आली.



## गोदावरी नदीत सापडलेला मृतदेह पंचाळे (ता. सिन्नर) येथील ३२ वर्षीय युवकाचा असल्याचे निष्पन्न

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



**निफाड** :- गोदावरी नदीपात्रात वाहून आलेला अज्ञात मृतदेह पंचाळे (ता. सिन्नर) येथील सागर रामनाथ मोरे (वय ३२) याचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. दि. १७ जुलैच्या दरम्यान गोदावरी नदीपात्रात एक मृतदेह वाहून जाताना नागरिकांच्या लक्षात आला. चांदोरी येथील आपत्कालीन बचाव समितीने मृतदेह काढण्याचा प्रयत्न केला, मात्र नदीच्या जोरदार प्रवाहामुळे तो वाहून गेला. त्यामुळे मृत व्यक्तीची ओळख न पटल्याने परिसरात संभ्रम व धास्तीचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर दि. १९ जुलै रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास ब्राम्हणवाडे शिवारातील गोदावरी नदीपात्रात मृतदेह आढळून आल्याची माहिती पोलीस पाटील सोमनाथ विश्वनाथ पितळे (ब्राम्हणवाडे) यांनी सायखेडा पोलिसांना दिली. सायखेडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू असताना मृतदेहाची ओळख पटवण्यात यश आले. मृत युवकाचे नाव सागर रामनाथ मोरे (वय ३२, रा. पंचाळे, ता. सिन्नर) असे आहे. सहायक पोलीस निरीक्षक विकास ढोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भाबड अधिक तपास करत आहेत.

## पीओपीवरून उठवलेली बंदी म्हणजे श्रद्धेचा विजय ; सांस्कृतिक मंत्रीआशिष शेलार यांचा मूर्तिकारांनी कृतज्ञतेने केला सत्कार

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

"पीओपीवरून उगाच गदारोळ करणाऱ्यांना सडेतोड उत्तर हिंदू सणावर डाग टाकण्याचा प्रयत्न फोल ठरवला!"आशिष शेलार यांची तांबडशेतमध्ये गर्जना मूर्तिकारांनी कृतज्ञतेने केला सत्कार "पीओपी मूर्तींवर बंदी आणून आमच्या गणेशोत्सवाच्या मुळावर घाव घालण्याचा प्रयत्न झाला. पर्यावरणाच्या नावाखाली हिंदू सणांनाच लक्ष्य करण्याचा डाव काहींनी खेळला. पण हा डाव आम्ही उधळून लावला," अशा जळजळीत शब्दांत सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी विरोधकांवर




जोरदार टीका केली.पेणच्या तांबडशेत येथे हमरापूर गणेश उत्कर्ष मंडळातर्फे शेलार यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले, "पीओपी मूर्तीमुळे प्रदूषण होतं हे सिद्ध करणारा कोणताही वैज्ञानिक पुरावा नव्हता. काही मंडळींनी पोटशूळ उठवून याला पर्यावरणाचा मुद्दा बनवला. आम्ही उच्च न्यायालयात लढा दिला आणि सरकारने सत्य बाजू मांडून पीओपीवरील बंदी मागे घेतली."लाखो मूर्तिकारांचा श्वास परत आला "लाखो मूर्तिकार, कामगार, कलाकार यांचा रोजगार वाचवण्याची ही लढाई होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळेवर योग्य पाऊल उचलल्यामुळे हा विजय शक्य झाला," असेही शेलार म्हणाले.
भव्य उपस्थितीत उत्सवी वातावरण या कार्यक्रमाला खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, नीलिमा पाटील, चित्रा पाटील, वैकुंठ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. मूर्तिकार संघटनेतर्फे अभय म्हात्रे, कुणाल पाटील, नितीन मोकल, हितेश जाधव, सुनील पाटील यांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत आशिष शेलार यांचे आभार मानले."सण, संस्कृती आणि रोजगाराचं रक्षण केलं"
"गणेशोत्सव म्हणजे केवळ धार्मिक परंपरा नाही, तर हजारो हातांना रोजगार देणारा महोत्सव आहे. सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे आमचं आयुष्यच वाचलं," अशी भावना उपस्थित मूर्तिकारांनी बोलून दाखवली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद पाटील तर आभार प्रदर्शन मूर्तिकार कुणाल पाटील यांनी केले.

## पर्यावरण संवर्धन व विकास समितीचा पदभार समारंभ व वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**यवतमाळ-** जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धन व विकास समिती वाढीस यावी म्हणून व पर्यावरणाचे रक्षण व्हावे या हेतूने जिल्हा कार्यकारणी कडून पर्यावरण क्षेत्रात व सामाजिक कार्यात आवड असलेल्या व करत असलेल्या कार्यात अधिक भर पडावी म्हणून यवतमाळ जिल्ह्यातील तालुका पातळीवर मारेगाव,पांढरकवडा, राळेगाव,कळंब व यवतमाळ शहरातील पर्यावरणाची आवड असलेल्या पत्रकार व ननागरिक अनेक सदस्यांना संस्थापक अध्यक्ष मा.डि.के.आरिकर (दलितमित्र व आदिवासी सेवक) यांच्या हस्ते व यवतमाळ जिल्हाध्यक्ष विनोद दोंदल, जिल्हासचिव प्रकाश खुडसंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा संघटक कैलास कोडापे यांच्या सहकार्याने आणि अजय मांडवकर,अरविंद कोडापे, सुविधाताई बाबोडे, प्रणालीताई येरपुडे,मनोहर बोभाटे यांच्या उपस्थितीत मारेगाव, पांढरकवडा,राळेगाव,कळंब तालुक्यातील समाज कार्यात अग्रेसर असलेल्या व्यक्तींना पदभार देण्यात आला यामध्ये कविताताई धुर्वे(पत्रकार)विशाल



मासुरकर(पत्रकार) जितेंद्र खोडे (पत्रकार) सोमेश्वर गेडेकर,संदीप कारेकार,मयूर मरसकोल्हे,प्रवीण गलाट,तुषार देवतळे,योगेश धोंडे,वीरेंद्र चव्हाण,गजानन सुरकर,महेश मेश्राम,मंगेश ठाकरे,पवन जाधव,नरेश राऊत,सुहास मुडे,राकेश मडावी,कृष्णा कोटरंगे,मनोज जुमनाके इत्यादी अनेक सदस्यांना नियुक्तीपत्र देऊन पदभार देण्यात आले.त्याच बरोबर प्रत्येक तालुक्यातील विश्रामगृह परीसर वृक्षारोपण करून,नवनिर्वाचित सदस्यांन कडून प्रत्येक तालुक्यातील गाव,खेडे व शहरात वृक्षारोपण करणे तसेच प्रत्येक तालुक्यातील कार्यकारणी सदस्यांना सोबतीने तालुक्याला लागून असलेल्या नदीपात्रातून वाळू माफिया कडून मोठ्या प्रमाणात चोरट्या पद्धतीने रेती उपसा होऊन नदीपात्राचे व निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे हे थांबवण्यासाठी रेती तस्करी करणाऱ्या लोकांवर प्रशासना मार्फत निर्बंध आणण्याचा प्रयत्न करणे, तालुक्यातील प्रत्येक गावा-गावात व शहर सुशोभीकरण करण्यास मदत करतील व शहरातील तसेच गावातील शाळेच्या मैदानात,मोक्षधम मध्ये,खुल्या जागेत,रोडच्या कडेला, मैदानात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला जाईल तसेच गावातील व शहरातील नागरिकांना पर्यावरणाचे महत्व पटवून देऊन वृक्षतोड थांबवण्यासाठी प्रयत्न करणे याची ग्वाही घेण्यात आली.

## वंचित-अनाथांसाठी आशेचं केंद्र – शिवाजी आश्रम शाळेत शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**केळगाव तांडा (ता. परतूर, जि. जालना) –**

दिनांक 16 जुलै 2025 रोजी शिवाजी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, केळगाव तांडा येथे राजे श्री शिवशाही समूह, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने "चला महाराष्ट्र घडवूया" या उपक्रमांतर्गत होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या शाळेत मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांतून येणाऱ्या वंचित, अनाथ व निराधार विद्यार्थ्यांना निशुल्क प्रवेश दिला जातो. आतापर्यंत शाळेच्या माध्यमातून शेकडो डॉक्टर, इंजिनीअर, वकील, अधिकारी आणि शिक्षक घडले आहेत. जालना, परभणी, नांदेड आदी जिल्ह्यांतील अनेक विद्यार्थी येथे निवासी स्वरूपात शिक्षण घेत आहेत. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांना कुटुंबवत्सल भावनेने वागणूक




देतात, संस्कारक्षम वातावरण पुरवतात आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देत त्यांना घडवतात. या उपक्रमाद्वारे दप्तर, वही, पेन, कंपास, पॅड आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शिवशाही समूहाचे संस्थापक अध्यक्ष गणेशदादा चव्हाण, सौ. सरिकाताई चव्हाण, जिल्हाध्यक्ष श्रीराम बालाजीभाऊ शेळके, श्री. अरविंद गुंजिटे सर, शाळेचे मुख्याध्यापक पासमे सर, बेंबडे सर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या प्रसंगी बोलताना गणेशदादा चव्हाण म्हणाले, "या शाळेच्या सहवासात विद्यार्थ्यांना जे मूल्याधिष्ठित शिक्षण मिळते, त्यामुळे ते केवळ सुशिक्षित नाही तर सुसंस्कारित नागरिक म्हणून समाजात पुढे येतात. शिवशाही समूह अशा शाळांशी जोडलेला आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे." कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शाळेचा हा उपक्रम ग्रामीण व सामाजिक विकासासाठी एक आदर्श ठरत आहे.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या रिसोड तालुकाध्यक्षपदी नारायणराव आरु पाटील यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजीत ठाकूर**

रिसोड : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने पत्रकारहितासाठी कार्यरत असणाऱ्या नारायणराव आरू पाटील यांची रिसोड तालुकाध्यक्षपदी पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या निवडीचे पत्र नुकतेच देण्यात आले. या निवडीसाठी संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकोडे, कार्याध्यक्ष निलेश सोमाणी, सरचिटणीस विश्वास आरोटे, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, विदर्भ कार्याध्यक्ष अजय खेडकर, अमरावती विभागीय अध्यक्ष सुनील फुलारी यांच्याशी सल्लामसलत करून ही घोषणा करण्यात आली. नारायणराव आरू पाटील हे पत्रकार क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवित आले आहेत. त्यांच्या या निवडीमुळे स्थानिक पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. संघटनेच्या ध्येयधोरणानुसार पत्रकार संघटना मजबूत करणे, पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे व त्यांना न्याय मिळवून देणे यासाठी ते कटिबद्ध राहतील, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी,यांचे हस्ते आणी डॉ .बाहेती,प्रभाकर काळे,प्रा.रवी अंभोरे,पवन छित्तरका ,शितल धांडे, यांच्या उपस्थितीत यांनी निवडीचे पत्र दिले.आणी अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. रिसोड तालुकाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करतांना नारायणराव आरू पाटील म्हणाले, "माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दल मी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे आभारी आहे. संघटनेने मला दिलेली ही जबाबदारी मी पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. पत्रकार संघटना मजबूत करणे, स्थानिक तसेच ग्रामीण पत्रकारांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडणे आणि पत्रकार बांधवांचे हक्क व हितसंबंध अबाधित राहावेत यासाठी मी कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त केले.यावेळी संघटनेचे पदाधिकारी गणेश देगावकर, प्रदिप देशमुख,अशोक चोपडे, डॉ.रामेश्वर रंजवे, धैर्यशील जोशी, सचिन गांजरे,शेख मोहम्मद सरवर , कैलास महाजन, इत्यादी सदस्य उपस्थित होते.



# सिद्धांत सामाजिक संस्थेतर्फे सोमटणे राजिप शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/ प्रतिनिधी :-**

सिद्धांत सामाजिक शैक्षणिक कला क्रीडा सांस्कृतिक संस्थेमार्फत सोमवार दिनांक 21 जुलै रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा सोमटणे दहिवली गिरवले या शाळांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप सोमटणे जिल्हा परिषद शाळेत महापुरुषांचे फोटो पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष सागर जाधव उपाध्यक्ष रुपेश जाधव कार्याध्यक्ष संतोष कांबळे खजिनदार मयूर जाधव सचिव



सारंग जाधव प्रकाश जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते रिपाई नेते संतोष पवार शरद म्हात्रे विक्रम जाधव सुधीर पवार चंद्रकांत कांबळे गजानन जाधव साहिल कांबळे ऋषी गायकवाड रत्नमाला पाबरेकर, राज सदावर्ते यांचे स्वागत करण्यात आले मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद शाळा सोमटणे दहिवले गिरवले एकूण १०६ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले तसेच जिल्हा परिषद शाळांना महापुरुषांच्या फोटोची फ्रेम भेट देण्यात आली या कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे सदस्य विशाल म्हसकर,अविनाश अडगळे बिपिन गायकवाड, प्रियाताई, शरद मात्रे उपेंद्र भोईर आकाश पाटेकर अतुल कांबळे , सतेज गुरव, केतन कांबळे, कल्पेश सोनके आधीच अनेक मान्यवर उपस्थित होते शैक्षणिक कला क्रीडा सांस्कृतिक संस्थेमार्फत सोमवार दिनांक 21 जुलै रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा सोमटणे दहिवली गिरवले या शाळांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप सोमटणे जिल्हा परिषद शाळेत महापुरुषांचे फोटो पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष सागर जाधव उपाध्यक्ष रुपेश जाधव कार्याध्यक्ष संतोष कांबळे खजिनदार मयूर जाधव सचिव सारंग जाधव प्रकाश जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते रिपाई नेते संतोष पवार शरद म्हात्रे विक्रम जाधव सुधीर पवार चंद्रकांत कांबळे गजानन जाधव साहिल कांबळे ऋषी गायकवाड रत्नमाला पाबरेकर, राज सदावर्ते यांचे स्वागत करण्यात आले मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद शाळा सोमटणे दहिवले गिरवले एकूण १०६ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले तसेच जिल्हा परिषद शाळांना महापुरुषांच्या फोटोची फ्रेम भेट देण्यात आली या कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे सदस्य विशाल म्हसकर,अविनाश अडगळे बिपिन गायकवाड, प्रियाताई, शरद मात्रे उपेंद्र भोईर आकाश पाटेकर अतुल कांबळे , सतेज गुरव, केतन कांबळे, कल्पेश सोनके आधीच अनेक मान्यवर उपस्थित होते

## वडकी येथील स्मॉल वंडर हायस्कूल येथे वृक्षारोपण साजरा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**वडकी:-**एक पेड मॉ के नाम या योजने अंतर्गत पालक ,विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले,वृक्षारोपण करण्यात विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून येत होता आंबा,कडुलिंब,



चिकू,पिंपळ,सिताफळ,लिंबू,करंज तसेच चाफा मोगरा, गुलाब, चमेली,गुलमोहर,फुलझाडे इत्यादी विद्यार्थ्यांनी लावली,शंभराच्या वर झाडांचे वृक्षारोपण शाळेच्या आवारात व आसपासच्या परिसरात करण्यात आले. विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच लावलेली झाडे जिवंत राहतील यासाठी वृक्ष दत्तक योजना विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी लावलेल्या झाडाचे रक्षण करण्याचे वचन विद्यार्थ्यांनी दिले,पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण शिवाय पर्याय नाही नाही असे मत कॉलेजच्या प्राचार्या डॉ.मंजुषा सागर यांनी व्यक्त केले.विद्यार्थ्यांनी वृक्ष रॅली काढून ,निवडक पालकांनीही यावेळेस हजेरी लावली होती.शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धनाविषयी मार्गदर्शन केले तसेच मयूर ताठे,जितेश गवळी,मानव राऊत उदय लालसरे,शशांक येलके,अनुज कांबळे,आयुष मानकर यांनी वृक्षारोपन करताना महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहयोगाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम जोश पूर्ण वातावरणात पार पडला, यावेळी अहमद शेख,शंकर मालखेडे,विजय फुलकर,नीता फुटाणे,अक्षय वानखेडे,दाते मॅडम वैभव करडे,रुबीना शेख तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.

## ओबीसी जनमोर्चाच्या मुंबई विभाग अध्यक्षपदी अरविंद डाफळे तर सरचिटणीस पदी प्रा.रोशन चव्हाण यांची नियुक्ती.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**



मुंबई विभाग 'ओबीसी जनमोर्चा' च्या बांधणीसाठी काही प्रमुख मान्यवर तसेच कार्यकर्ते यांची बैठक शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी, संध्याकाळी ठीक ६.३० वाजता, कुणबी ज्ञाती गृह वाघे हॉल, परेल, मुंबई येथे जनमोर्चा कार्याध्यक्ष चंद्रकांत बावकर सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेला आगरी, कुणबी, तेली, भंडारी, नाभिक, धनगर समाज संघटना यांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत कुणबी समाजोन्नती संघाचे सरचिटणीस कृष्णा वणे, सह सचिव प्रमोद खेराडे, राज्य समन्वयक माधव कांबळे, किरण डिके, राज्य कार्यकारणी पदाधिकारी संदेश मयेकर, अरविंद डाफळे, शांताराम दिघे, प्रकाश तोडणकर सर,प्रफुल्ल खानविलकर, दीपक म्हात्रे, अरुण पाटील, सुरेश पाटील, सुरेश मांडवकर, प्रकाश वालम,प्रविण पाटील, युवा सेक्रेटरी सचिन रामाणे, रोशन चव्हाण, असे मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुंबई विभाग अध्यक्ष म्हणून अरविंद डाफळे व सरचिटणीस म्हणून रोशन चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ओबीसी जनमोर्चा मुंबई कमिटी बांधणी तसेच पुढील काळात होणारी जातनिहाय जनगणना बाबत जनजागृती यासाठी हि बैठक महत्वपूर्ण होती.

# सर्वसामान्य मनसापर्यंत आरोग्य सुविधा पोहचविणार..

## ड्रॉ . अनिल कावरखे जिल्हा शल्य चिकत्सक भूमिपुत्र शेतकरी.

**दैनिक युवक आधार**
**. रिसोड प्रतिनिधी रणजीत सिंह ठाकुर**

..... संघटनेकडून काल मोप तालुका रिसोड येथे भव्य आरोग्य शिबिर व जिल्हा शैल्य चिकित्सक माननीय मा. डॉक्टर अनिल कावरखे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माननीय विष्णुपंत भुतेकर हे होते. मान्यवरांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उदघाटन करून सत्कार मूर्ती ड्रा. अनिल कावरखे यांचा भगवान धन्वन्तरीची चांदीची मूर्ती, सन्मान पत्र व फेटा बंधून सत्कार करण्यात आला. ग्रामीण




भागातील शेतकरी शेतमजूर सर्वसामान्य माणसाला आरोग्य सुविधा मिळावी म्हणून नेत्र, मुळव्याध भगंदर, फिशर, नाक, कान, घसा या सह इतरही आजारांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून करण्यात आले होते. या वेळी सत्काराला उत्तर देतांना जिल्हा शल्य चिकित्सकांनी सर्व सामान्य माणूस केंद्र बिंदू मानून जिल्याहातील आरोग्य यंत्रणा काम करणार असल्याचे सांगितले, कार्यक्रमाचे आयोजन शिबीर संयोजक महावीर पवार यांनी तथा श्री गजानन हॉस्पिटल मोप यांनी केले होते. यावळी गजाननराव पाचरणे, ड्रा. गवळी, ड्रा अरुन देशमुख यांनी ड्रा. अनिल कावरखे व भूमिपुत्र च्या कामाला शुभेच्छा दिल्या. रिसोड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यासाठी तथा मांगूळ झनक यथील स्त्री रुग्णालय लवकरात लवकर सरू करण्याची विनंती अध्यक्ष पदावरून वोलतांना विष्णुपंत भुतेकर यांनी केली. रुग्णांना रुग्णांचे आरोग्य निदान व मोफत औषध वाटप या वेळी करण्यात आले. शिबिरामध्ये डॉक्टर जाजू साहेब, डॉक्टर तृप्ती जितेंद्र गवळी, नेतृतज्ञ डॉक्टर खान साहेब, डॉक्टर विठ्ठल पाचरणे व सौ दिपाली विठ्ठल पाचरणे यांनी मोफत सेवा दिली. शिबिरामध्ये सर्व प्रकारच्या आजारांचे 300 च्या वर रुग्ण तपासणी करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थतिथा मधे गजाननराव पाचरणे, ड्रा. जितेंद्र गवळी, रवींद्र चोपडे, ड्रा. अशोक इंगोले, ड्रा. धोंडगे साहेब, ड्रा. अरुन देशमुख, ड्रा. शंकर वाघ, ड्रा. राम बोडखे, ड्रा. अमोल नरवाडे, ड्रा. महेश खांझोडे, श्रीरगं नागरे, तान्हाजी गाडे, गजानन नरवाडे, रवी जाधव, पप्पु हेंद्रे, शंकरराव मुंढे,शंकरराव देशमुख, अशोक नरवाडे, पंढरी नरवाडे, विशाल मोरे, संतोष गव्हाणे, पत्रकार सतीश मंदळे, प्यारेलाल नागरे, महादेव पाटील सानप, दीपक सरोदे, हरी बाजड, शंकर सदार, ज्ञानेश्वर पाचरणे, भागवत बोडखे, शुभम टकले हे होते कार्यक्रमाचे सूत्र संचालन गजानन खंदारे यांनी केले. यांच्या सह भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, कर्यकर्ते परिसरातील शेतकरी व महिला पुरुष रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठ्ठल रुक्मिणी महिला दूधउत्पादक सहकारी संस्था निवडणुकीत चेअरमन पदी ज्योती समाधान पाटील बिनविरोध धार तालुका धरणगाव

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**



विठ्ठल रुक्मिणी महिला दूध उत्पादक सहकारी संस्था निवडणूक : धरणगाव तालुका व जिल्ह्यात दुग्ध क्षेत्रामध्ये नावलौकिक प्राप्त केलेल्या विठ्ठल रुक्मिणी महिला दूध उत्पादक सहकारी संस्था धार ता.धरणगाव पंचवार्षिक निवडणुकीत संचालक मंडळाच्या सन 2025 ते 2030 यासाठीची निवडणूक दिनांक 19/7/ 2025 रोजी बिनविरोध झाली. विठ्ठल रुक्मिणी महिला दूध उत्पादक संस्था मर्यादित धार निवडणूक साठी सदर संस्थेत दोन पदासाठी एक एक अर्ज दाखल अर्ज झाले होते. त्यामुळे ते बिनविरोध झाले त्या चेअरमन पदी ज्योती समाधान पाटील व व्हाईस चेअरमन पदी राजलक्ष्मी पंढरीनाथ पाटील यांची सर्वांना मध्ये बिनविरोध निवड करण्यात आली कारण संस्थेचा कारभार हा अत्यंत पारदर्शक आहे सदर निवडणूक प्रक्रिया ही सहकार खात्याचे श्री ए.टी.कांबळे यांनी निवडणूक अध्यासी अधिकारी म्हणून काम पाहिले.

सदर संस्थेला सन 2023-24 साठी तालुका प्रथम पारितोषिक मिळाले आहे .सदर संस्थेत म्हैस दूध 1200 लिटर प्रतिदिन संकलणाचा आलेख चांगल्या प्रकारे रचला आहे.त्यासाठी सन 2024-25 ला विकास लक्ष्मी पुरस्काराने नामांकन मिळाले आहे. तसेच यापुढे धार या कार्यक्षेत्रासह पंधराशे लिटर दुधाचे प्रतिदिन संकलन करण्याचे उद्दिष्ट, यावर संस्थेने भर दिला आहे. याप्रसंगी सचिव सौरभ लखीचंद पाचपोळ सर्व संचालक मंडळ समाधान पाटील मयूर कोळी अमोल पाटील व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वरूड जहांगीर येथे स्मशानभूमीची दुर्दशा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



**राळेगाव:-**तालुक्यातील वरुड जहांगीर येथील ग्राम पंचायत ही पेसा अंतर्गत येणारी ग्राम पंचायत असून या गावातील विकासकामांला इतर ग्राम पंचायत पेक्षा काही प्रमाणात जास्त निधी येत असल्याचे कळले असून फक्त तो निधी कशा पद्धतीने आणि कुठे खर्च करायचा हे पदाधिकाऱ्यांवर अवलंबून असते.अशातच गावकरी आणि ग्राम पंचायत या मधला दुवा म्हणून कार्यरत असलेले सचिव यांची जर भुमिका व्यवस्थित असली तरी गावातील वातावरण समतोल राखण्यासाठी सहकार्य होऊ शकते मात्र या गावातील विकासकामे तर सोडाच पण साधी स्मशानभुमी सुद्धा या ग्रामपंचायतीने व्यवस्थित ठेवली नाही. या स्मशानभुतीतील एक शेड जिर्णावस्थेत असून त्याची साधी दुरूस्ती, डागडुजी करण्यात आली नाही.तीथे बसविलेला सौर ऊर्जेचा बसविलेला लाईट सुद्धा दिसून आला नाही. त्या परिसरातील आलेल्या लोकांना बसण्यासाठी गावातील दात्यांनी दिलेले बाकडे सुद्धा रंगहीन झाले असून त्याला परत रंगोटी करण्याचा साधा प्रयत्न केला नाही.त्या स्मशानभूमीला बांधकाम करताना केलेली रंगरंगोटी करण्यात आली होती त्यानंतर परत ग्रामपंचायतीने फिरून कधी पाहिलं सुद्धा नाही किंवा रंगरंगोटी करण्याचा प्रयत्न केला नाही. परिसरातील वाढलेले काटे, झाडेझुडपे स्मशानभूमीच्या परिसरात प्रवेश करताना असलेल्या बाहेरच्या दोन्ही भिंतींच्या बाजू झाडाझुडुपांनी वेढल्या असून कधी ग्रामपंचायतीने साफ करून घेतले नाही. अशा वेळी ग्राम पंचायतमध्ये सत्ताधाऱ्यांची एक हाती सत्ता असून विरोधी बाकावर बसणारे तीन सदस्य असल्याने त्यांना कुठल्याही कामात विश्वासात घेतले जात नाही. अशी माहिती ग्राम पंचायतचे विरोधी सदस्य रामधन राठोड यांनी दिली,अशा परिस्थितीत गाव आणि ग्रामपंचायतीच्या मधली योग्य भूमिका बजावणाऱ्या सचिवांनी मनावर घेतले तर छोटी मोठी कामे ते पण मार्गी लाऊ शकतात पण असेही होत नाही अशातच वेळात वेळ काढून श्रावणसिंग वडते सर,रामधन राठोड, किरण निम्रड,प्रशांत भोरे,भानुदास चव्हाण,रमेश राठोड,पुनेश्वर ऊईके देवा कामटकार,अनिकेत कामटकार, आदित्य पेंदोर,गजानन झाटे,सौरभ वडते यांनी स्मशानभूमीची पाहणी केली असता तेथील दैनिय अवस्था पाहून लागलीच तेथील तरूणांच्या माध्यमातून परिसरातील वाढलेला काटे झाडेझुडपे स्वच्छता करून घेतली आणि राहिलेला उर्वरित स्वच्छता येत्या एक दोन दिवसात करणार असल्याचे श्रावनसिंग वडते सर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## रेवदंडा साळाव चेक पोस्टवर बेकायदेशीर वाळू वाहतूक करणारा ट्रक जप्त – ट्रकसह १५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा साळाव चेक पोस्टवर आज पहाटे ३.१५ वाजण्याच्या सुमारास एक मोठी कारवाई करण्यात आली. बेकायदेशीरपणे समुद्रातून वाळू उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ट्रकचा पर्दाफाश करण्यात आला असून सुमारे १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच ०९ ईएम ६९३० या क्रमांकाच्या ट्रकमधून सुमारे ६ ब्रास समुद्र वाळूची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. सदर ट्रक रेवदंड्याकडून पुलावरून साळाव चेक पोस्टकडे येत असताना थांबवण्यात आला.या प्रकरणी मनोजकुमार तानाजी पाटील (वय २९, रा. कनगल, ता. हुक्केरी, जि. बेळगाव, कर्नाटक राज्य) याच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०३(२) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ आणि खनिज अधिनियम १९५७ अंतर्गत कलम २१ अन्वये गुन्हा क्रमांक ८३/२०२५ नुसार रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईची तक्रार हेमंत सुधाकर चांदोलकर (तलाठी, सजा बोर्ली) यांनी नोंदवली असून, पोलिस निरीक्षक मंगेश बाचकर व पो.ह. श्री पाटील हे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करत आहेत.*कोकण किनारपट्टीवरील वाळू माफियांवर आळा बसणार का?या घटनेनंतर पुन्हा एकदा कोकणातील बेकायदेशीर वाळू उत्खननाचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. स्थानिक प्रशासनाने यावर कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.



## संत शिरोमणि सावता महाराज संजीवन समाधी सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा करावा – योगेश भैय्या जाधव यांचे आवाह

दैनिक युवक आधार
छत्रपती संभाजी नगर(प्रतिनिधी) –

संत शिरोमणि सावता महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा दिनांक २३ जुलै २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा होणार असून, हा सोहळा अधिकाधिक श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा करण्याचे आवाहन सावता भक्त योगेश भैय्या जाधव (युवक जिल्हाध्यक्ष, सावता परिषद जालना व संस्थापक अध्यक्ष, मंथुराबाई जाधव फाउंडेशन, सेलगाव) यांनी केले आहे. सावता महाराजांनी प्रभू पांडुरंगाच्या साक्षीने सूर्य उगमाच्या वेळेस संजीवन समाधी घेतली होती. त्यामुळे हा सोहळा प्रत्यक्ष पहाटे ५ ते ६ वाजेच्या दरम्यान साजरा करण्याची परंपरा आहे. तथापि, भक्तांच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी हा सोहळा दुपारी १२ वाजता साजरा केला जातो, याचीही नोंद योगेश भैय्यांनी घेतली आहे. संत सावता महाराज यांच्या समाधी सोहळ्याला 'पुण्यतिथी' म्हणणे चुकीचे असून, सर्व कार्यक्रमांत 'संजीवन समाधी सोहळा' असा उल्लेख करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. "उठोनि प्रतकाळी प्रणायाम साधिला..." या अभंगाच्या माध्यमातून संत सावता महाराजांच्या समाधी वेळेचा संदर्भ दिला जातो. हा सोहळा केवळ परंपरा म्हणून नव्हे तर संतांच्या कार्याची, विचारांची आठवण करून देणारा आहे. त्यामुळे राज्यभरातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावे, आणि आपल्या गावात, संस्थांमध्ये, मंदिरांमध्ये हा संजीवन समाधी सोहळा साजरा करावा, असे आवाहन योगेश भैय्या जाधव यांनी केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नागपूर मध्यवर्ती कारागृह, अमली पदार्थ व्यसन मुक्तीबाबत प्रबोधनात्मक व्याख्यान

**दैनिक युवक आधार**
**नागपूर प्रतिनिधी**

मा.श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदयासाठी डॉ. भूषणकुमार उपाध्याय, माजी. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचा अमली पदार्थ व्यसन मुक्तीबाबत प्रबोधनात्मक व्याख्यान कार्यक्रम दिनांक 19.07.2025 रोजी आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यकमाचे प्रस्ताविक तथा कार्यक्रमाची सुरवात श्रीमती दिपा वै.आगे, अति.अधीक्षक यांनी डॉ.भूषणकुमार उपाध्याय यांच्या सेवा कार्याचा अल्प परिचय देवून करण्यात आली.

डॉ.भूषणकुमार उपाध्याय साहेब यांनी व्याख्यान दरम्यान बंदयांना शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपचार पध्दती त्यांचे प्रात्याक्षीक बंदयाकडून करवून घेतले त्यांच्या व्याख्यानामध्ये खालील बाबीचां समावेश करण्यात आला होता. डॉ. उपाध्याय व्याख्यानातील महत्वाची भूमिका :- डॉ. उपाध्याय साहेबांनी त्यांच्या व्याख्यानामध्ये फक्त सैद्धांतिक भाष्य न करता, प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून बंद्यांना विविध उपचारपद्धतींशी जोडले. यात योग, प्राणायाम, ध्यानधारणा, नैसर्गिक उपचार, आहारतत्व, आणि समुपदेशन (COUNSELLING) यांचा समावेश होता. विशेष म्हणजे, हे उपक्रम बंदयांच्या सहभागातून तसेच बंदयांना त्यांना मनापासून स्वीकारले गेले, कारण ते "आज्ञेने" नव्हे तर "समजून" व "उमजून" डॉ.उपाध्याय साहेब यांनी करवून घेतले होते.

मन शांतीसाठी नियमीत मार्गदर्शन,



नशामुक्ती व व्यसनमुक्तीसाठी शास्त्रीय उपाय, मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रार्थना, ध्यानधारणा, भ्रामरी प्राणायाम, सकारात्मक विचारसरणी व आत्मपरीक्षण यासाठी मार्गदर्शन या प्रात्यक्षिक पद्धतीचा परिणाम बंदयांच्या बंद्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल तसेच आक्रमकतेमध्ये घट, संवादकौशल्यात वाढ तसेच बंदयांनी पुन्हा गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता कमी होईल असे मत व्यक्त केले.

कारागृह अधीक्षक श्री. वैभव सु.आगे यांनी अध्यक्षीय भाषण तसेच अभार व्यक्त करतांना डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांचे कार्य बंद्यांच्या मनामनात परिवर्तन घडवणारे होते. त्यांनी व्यवस्थेच्या चौकटीत राहून, ती चौकट अधिक मानवी बनवली. बंदीगृह म्हणजे फक्त शिक्षा नव्हे, तर परिवर्तनाची संधी हे त्यांनी गळाभेट सारखे उपक्रमाची सुरवात करून त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

त्यांचे हे योगदान कारागृह व्यवस्थापनातील एक 'मानवीकरणाचा' आदर्श आहे. बंदयांमध्ये आत्मचिंतनाची प्रेरणा, आरोग्यप्रद जीवनशैलीची जाणीव आणि समाजात पुन्हा प्रतिष्ठित जीवन जगण्याची उमेद त्यांनी दिली – हे कार्य केवळ एक अधिकारी म्हणून नव्हे, तर एक समाजसुधारक म्हणून त्यांची ओळख ठरते. डॉ. भूषणकुमार उपाध्याय साहेब एक संवेदनशील, दूरदृष्टी असलेले प्रशासक होते, ज्यांनी कारागृह व्यवस्थापनात "मानवी मूल्यांचा" समावेश केला. त्यांच्या नेतृत्वाखाली, कारागृहातील बंदयांच्या केवळ सुरक्षा व्यवस्थेवर नव्हे, तर त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यावर विशेष भर देण्यात आला. असे मत श्री. आगे सर यांनी अभार व्यक्त करतांना मांडले.

सदर कार्यक्रमावेळी कारागृह अधीक्षक श्री.वैभव आगे, अति. अधीक्षक श्रीमती दिपा वै.आगे, उप अधीक्षक श्री. श्रीधर काळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.आनंद पानसरे, श्री.विजय हिवाळे, हवालदार श्री. संजय गायकवाड, शिपाई श्री. पंकज बुराडकर, यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारागृह शिक्षक श्री.लक्ष्मण साळवे यांनी केले तसेच कारागृह अधीक्षक श्री. वैभव आगे, यांनी कार्यक्रम यशस्वी करणारे सर्व अधिकारी/कर्मचारी व बंदीचे आभार मानले.

## फुले ,शाहू ,चॅरिटेबल अँड वेल्फेअर फाउंडेशन ठाणे (मुंबई )तर्फे विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा 17 ऑगस्ट रोजी होणार सत्कार

**संपर्क करण्याचे आवाहन**
**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

फुले ,शाहू चॅरिटेबल अँड वेल्फेअर फाउंडेशन ठाणे (मुंबई) या एनजीओ सामाजिक संस्थेमार्फत जे विविध सामाजिक क्षेत्रात, उदाहरणार्थ सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार , प्रबोधनकार,कवी ,लेखक , साहित्यिक ,डॉक्टर,वकील, इंजिनियर , यांच्या कार्याला प्रेरणा मिळावी व त्यांच्या मानसन्मान व्हावा या उदात्त हेतूने भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे 17 ऑगस्ट 2025 ला रोज रविवार 1 वाजता, साहित्यरत्न, कलाभूषण, महात्मा ज्योतिबा फुले



समाजभूषण, राजश्री शाहू महाराज समाजभूषण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण, समाजरत्न ,पत्रकारिता पुरस्कार ,देऊन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे. त्यात सन्मानचिन्ह ,सन्मान प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ, ऑफिशियल बॅग, यांचा समावेश असेल त्यांनी आपली नोंदणी विजय शिवाजीराव हिंगोले मोबाईल क्रमांक 9890117358 ठाणे मुंबई,संजीव भांबोरे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य न्यूज चॅनल भंडारा मोबाईल क्रमांक 7066370489 यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून 10 ऑगस्ट पर्यंत करावी अन्यथा आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही . त्याचप्रमाणे महाराष्ट्रात जे बुद्ध विहार आहेत त्या परिसरामध्ये रोजगाराच्या दृष्टीने, त्याचप्रमाणे अपंग यांच्याकरता साधने उपलब्ध करून देणे, व मेडिसिन 50%दरात उपलब्ध करून देणे यावर सुद्धा मार्गदर्शन करण्यात येणार आहे

## प्रहार पक्षा तर्फे चक्काजाम आंदोलनाचे श.पो.स्टे येथे देण्यात आले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**राजु गायकवाड**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**

येथे शेतकरी कर्जमाफी व इतर मागण्यांसाठी येत्या 24 जुलै ला गुरुवार रोजी दुपारी 12 ते 2 या वेळेत होणाऱ्या महाराष्ट्र राज्यव्यापी 'चक्का जाम' आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुसद शहरातील टी पॉईंट माहूर टोड सुधाकररावजी नाईक पुतळ्या जवळ आंदोलन करण्यात येणार असून, याआंदोलनाला परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी निवेदन रविवारी 20 जुलै रोजी पुसद शहर पोलीस स्टेशन व वसंतनगर पोलिस स्टेशन येथे देण्यात आले यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका प्रमुख प्रदीप भाऊ आडे आणि प्रहार दिव्यांग क्रांती संघटना आंदोलनाचे पुसद तालुकाध्यक्ष संजयभाऊ गोदमले यांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे शेतकरी कर्जमाफी, हमीभाव व दिव्यांग मानधनासाठी आंदोलन ! पोलिस निरिक्षकांकडे यावेळी आंदोलनासाठी परवानगी मागताना देण्यात आलेल्या निवेदनामध्ये हे आंदोलन शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग आणि कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी असून, यात प्रमुख मागण्या शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाला हमीभाव (किमान आधारभूत किंमत) आणि दिव्यांग व्यक्तींना दरमहा ₹6000 मानधन मिळावे, अशा आहेत. नमूद करण्यात आले आहे. असे प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माननीय बच्चू भाऊ कडू याच्या आदेशानुसार आहे हे आंदोलन कोणत्याही एका राजकीय पक्षाचे नसून




सर्वपक्षीय असून, तालुक्यातील शहर पोलीस स्टेशन पुसद जि. यवतमाळ दिलेल्या राज्यव्यापी हाकेच्या समर्थनार्थ दि 24/07/25 रोजी पुसद तालुक्यात 'चक्का जाम' आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनास पाठिंबा म्हणून पुसद तालुक्यातही आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे सामान्य शेतकरी, दिव्यांग, शेतमजूर आणि सर्व कष्टकरी वर्गाचा सहभाग असेल, म्हणत शांततेत, शिस्तबद्ध आणि लोकशाही मार्गाने हे आंदोलन पार पाडले जाईल, असे स्पष्ट करत आयोजकांनी पोलिसांकडे परवानगीसाठी विनंती केली आहे. या वेळी उपस्थित प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका प्रमुख श्री प्रदीपभाऊ आडे, सचिव तुशाल व्यवहारे प्रसिद्ध प्रमुख निर्भय गायकवाड रुग्ण सेवक संतोष राठोड आणि प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे श्री संजयभाऊ गोदमले तालुकाध्यक्ष, किशोर कांबळे जिल्हाध्यक्ष भीम टायगर सेना, संजय राठोड अध्यक्ष दिव्यांग क्रिकेट, मारूती सुरोशे दिव्यांग संघ, शेख मुशीर उपअध्यक्ष दिव्यांग संघ, रवी दिडे, गजानन चव्हाण आदी उपस्थित होते.

## समस्त कक्कया समाज महासंघाच्या वतीने विविध पदाधिकाऱ्यांची एकमताने नियुक्ती!



प्रहार पक्षा तर्फे चक्काजाम आंदोलनाचे श.पो.स्टे येथे देण्यात आले निवेदन

**दैनिक युवक अध्यक्ष**
**मुंबई प्रतिनिधी**

समस्त कक्कया समाज महासंघाचा विस्तार महाराष्ट्रात सह संपूर्ण देशात व्हावा यासाठी समस्त कक्कया समाज महासंघाच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींची विविध पदावर एकमताने नियुक्ती केली आहे.यात

श्री हनुमंत सोनावणे अध्यक्ष पुणे मंडळ यांची सामाजिक बांधिलकी आणि निस्वार्थी स्वभाव तसेच एक अभ्यासू व्यक्ती म्हणून समस्त कक्कया समाज महासंघ यांनी कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. तर शशिकांत सोनावणे ( प्रवक्ता) यांची समस्त कक्कया समाज महासंघाने मुबंई जिल्हा प्रभारी निरीक्षक या पदावर नियुक्ती केली.तसेच मुकुंद सोनटक्के यांची जिल्हा अध्यक्ष अहिल्यानगर आणि महाराष्ट्र संघटक या पदी नियुक्ती केली आहे.

नवनाथ कोकणे (उपाध्यक्ष)यांची लातूर जिल्हा प्रभारी / निरीक्षक या पदावर नियुक्ती केली आहे. तर चंद्रकांत कोकणे (उपाध्यक्ष )सोलापूर जिल्हा प्रभारी / निरीक्षक या पदावर नियुक्ती केली आहे नियुक्ती झालेले सर्वच पदाधिकारी आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत म्हणूनच समस्त कक्कया महासंघानी याची दखल घेऊन त्यांची विविध पदावर नियुकी केली. तसेच निवड झालेल्या सर्व पदाधिकारी आपल्या पदाला योग्य न्याय देतील अशी अपेक्षा समस्त कक्कय्या महासंघाचे अध्यक्ष श्री निवृत्ती सावळकर,सरचिटणीस प्रकाश दरवेशी यांनी व्यक्त केली आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



दैनिक युवक आधार–
टाटा पॉवरने नुकताच लोणावळ्यातील निसर्गरम्य वालवण परिसरात एक अनोखा निसर्गभ्रमंती व वृक्षारोपण उपक्रम आयोजित केला. या उपक्रमात AIISEC फाउंडेशनमधील ३० अंध व्यक्तींनी भाग घेतला. या उपक्रमात पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक सशक्तीकरणाचे उद्दिष्टे एकत्रित करण्यात आले, ज्यामुळे टाटा पॉवरची शाश्वत विकास आणि समुदाय सहभाग यामधील बांधिलकी दिसून आली

## सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचा रायगडाच्या मूर्तिकारांकडून सत्कार !

### सण उत्सव नेहमी साजरे करण्यासाठी भाजप पक्ष मूर्तिकार जनतेच्या पाठी - मंत्री आशिष शेलार

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीवर आणलेली बंदी शिथिल केल्याबद्दल राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा रायगडचे संपर्कमंत्री ना. आशिष शेलार याचा रायगड जिल्ह्यातील समस्त मूर्तिकाकारां तर्फे सत्कार सोहळा हमरापूर विभाग गणेश उत्कर्ष मंडळातर्फे आयोजित करण्यात आला होता. यावेळी मंत्री आशिष शेलार यांनी उपस्थित जिल्ह्यातील मूर्तिकार यांना संबोधताना सण




उत्सव नेहमी साजरे करण्यासाठी भाजप पक्ष मूर्तिकार जनतेच्या पाठी असल्याचे सांगितले. खासदार धैर्यशील पाटील,आमदार रवींद्र पाटील,आमदार प्रशांत ठाकूर,आमदार महेश बालदि,उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील,प्रभाकर म्हात्रे,डीबी पाटील, प्रितम पाटील,माजी जिपअध्यक्षा निलिमा पाटील, मिलिंद पाटील, प्रवीण बावदणकर,हितेश जाधव, शर्मिला पाटील चित्रा पाटील, स्मिता पाटील,अध्यक्ष जयेश पाटील, कुणाल पाटील,नितीन मोकल,गोपिनाथ मोकल,सतीश पाटील,आजी माजी सरपंच उपसरपंच ग्रामस्थ होते.

आर्थिक संकटात सापडलेल्या मूर्तिकारांना न्याय देण्याचे काम आशिष शेलार साहेबांनी केले आहे. पर्यावरण विषय आणि मूर्तिकारांची जी काही समस्या आहे त्याला एक नाजूक समतोल निर्माण झाला परंतु या सर्व बाजूंनी मंत्री आशिष शेलार साहेबांनी पाहिलं आणि तज्ञांच्या सोबत बैठक घेतली आणि त्या बैठकीनंतर त्यांनी आपल्या हजारो कामगारांना न्याय मिळाला आहे असे मत भाजप उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी मानले.

यावेळी खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले विचार मांडताना मंत्री आशिष शेलार यांचे आभार मानले.

## चिपळूणच्या 'नृत्य मल्हार कथ्थक अकॅडमी'चा पुरीमध्ये नृत्य विजय!

### श्री जगन्नाथ धाम पुरी उत्सव २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत चार विद्यार्थिनींचा झळाळता डंका

दैनिक युवक आधार
योगेश सुतार चिपळूण| प्रतिनिधी

जगन्नाथपुरी, ओडिशा येथे आयोजित श्री जगन्नाथ धाम पुरी उत्सव २०२५ या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक महोत्सवात चिपळूणच्या 'नृत्य मल्हार कथ्थक अकॅडमी'ने भव्य यश संपादन करत कोकणाच्या संस्कृतीचा झेंडा उंचावला आहे.

या प्रतिष्ठित महोत्सवाचे आयोजन त्रिवेणी सांस्कृतिक केंद्र, कटक, ओडिशा यांनी केले होते. महोत्सवात सहभागी झालेल्या विविध राज्यांतील आणि देशांतील नृत्य कलाकारांमध्ये चिपळूणच्या स्कंधा चितळे यांच्या नेतृत्वाखालील नृत्य मल्हार कथ्थक अकॅडमीने आपली वेगळी छाप पाडली.




या स्पर्धेत अकॅडमीच्या पाच विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. ओपन ग्रुप कॅटेगरीत संपूर्ण समूहाने विशेष पुरस्कार पटकावला. त्याचप्रमाणे, स्वामिनी सुर्वे हिने सब-ज्युनिअर सोलो कॅटेगरीत, आर्या जठार हिने ज्युनिअर सोलो कॅटेगरीत, मानसी लिंगायत हिने सिनियर सोलो कॅटेगरीत, तर आदिती आगवेकर हिने ओपन सोलो कॅटेगरीत प्रथम क्रमांकाचे यश संपादन केले.

या विद्यार्थिनींना गुरु सौ. स्कंधा चितळे यांचे सखोल मार्गदर्शन, नित्य सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण व नृत्यकलेतील अनुभव यामुळेच यशाचे शिखर गाठता आले, असे मत कलाविशारदांनी व्यक्त केले आहे.

या आंतरराष्ट्रीय यशामागे नृत्य अकॅडमीचा परिश्रम तर आहेच, पण चिपळूण ते ओडिशा प्रवासाच्या नियोजनात नेरोलॅक कंपनीचे एचआर हेड नंदन सुर्वे व कालभैरव ढोलताशा पथकाचे सिद्धेश पाथरे यांचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले.

या यशानंतर नृत्य मल्हार कथ्थक अकॅडमीच्या विद्यार्थिनींना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मंचांवर नृत्य सादरीकरणाची दारे खुली होतील, असा विश्वास संस्थेच्या संचालिका स्कंधा चितळे यांनी व्यक्त केला.

या घवघवीत यशामुळे चिपळूणसह संपूर्ण कोकणात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. नृत्यकलेच्या माध्यमातून कोकणाची संस्कृती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणाऱ्या या विद्यार्थिनींचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संत रामपालजी महाराज यांचा भव्य आध्यात्मिक सत्संग नांदेड जिल्ह्यात उत्साहात पार पडला

**दैनिक युवक आधार**
**नांदेड,वार्ताहर**

नांदेड जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या जगतगुरू तत्वदर्शी संत रामपालजी महाराज यांच्या भव्य आध्यात्मिक सत्संगास हजारो भक्तांनी हजेरी लावली. आज दिनांक 20 जुलै रोजी नांदेड जिल्ह्यातील दत्तकृपा मंगल कार्यालय येथे हा भव्य सत्संग कार्यक्रम सकाळी ११ वाजता सुरू होऊन दुपारी १ वाजेपर्यंत शांततापूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या सत्संगात नांदेड जिल्ह्यांतून आलेल्या हजारो - श्रद्धाळूनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. - सत्संगामध्ये संत रामपालजी महाराज यांचे शिष्य उपस्थित होते. त्यांनी वेद, श्रीमद्भगवद्गीता, पुराणे, कुराण शरीफ, बायबल आदी धर्मग्रंथांच्या आधारावर पूर्ण ब्रह्म कबीर परमेश्वर हेच संपूर्ण - सृष्टीचे सर्जक, पालक व संहारक आहेत हे शास्त्राधारित सत्य स्पष्टपणे मांडले. प्रवचनांमधून खरा भक्ती साधना मार्ग, सतनाम जप, मानवी जीवनाचे खरे उद्दिष्ट मोक्षप्राप्ती यावर सखोल मार्गदर्शन देण्यात आले. संत रामपाल जी महाराज यांचा संदेश होता की, "आधुनिक -काळात खऱ्या ज्ञानाची आणि योग्य साधनेची




अत्यंत गरज आहे. ती केवळ शास्त्राधारित सत्संगातूनच मिळू शकते." कार्यक्रमाच्या दरम्यान धर्मशंका-समाधान सत्र, निःशुल्क नामदीक्षा (दीक्षा विधी) व पवित्र धार्मिक ग्रंथांचे मोफत वाटप करण्यात आले. यामुळे अनेक नव्याने आलेल्या भक्तांना सच्च्या आध्यात्मिक मार्गाची ओळख झाली. अनेकांनी आपल्या अनुभवामधून सांगितले की, "आमच्या आयुष्यात आज खऱ्या अर्थाने परिवर्तन घडले." सत्संगाचा संपूर्ण परिसर स्वच्छता, शिस्त आणि आध्यात्मिक वातावरणाने भरलेला होता. विशेषतः महिला व युवावर्गाचा मोठा सहभाग लक्षणीय ठरला. काही भक्तांनी सांगितले की, "या सत्संगामुळे मानसिक शांती, जीवनातील समस्यांवर उपाय आणि आत्मिक समाधान मिळाले." या कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक भक्तजन व स्वयंसेवकांच्या सहकार्याने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. नांदेड जिल्ह्यात अशा प्रकारचा हा पहिलाच भव्य सत्संग असल्यामुळे परिसरातील जनतेमध्ये याची विशेष चर्चा होती. संत रामपालजी महाराज यांचे असे शास्त्र अनुकूल सत्संग संपूर्ण भारतभर आणि महाराष्ट्रात वेळोवेळी घेतले जात असून, त्यांचा उद्देश समाजाला खऱ्या आध्यात्मिक मार्गाची दिशा देणे आणि प्रत्येक आत्म्याला मोक्षमार्गाकडे घेऊन जाणे हा आहे. या सत्संगानंतर नांदेड जिल्ह्यातील अनेक भक्तांनी संत रामपालजी महाराजांची नामदीक्षा स्वीकार करण्याचा संकल्प केला.

## MCOCA (मोक्का) गुन्हयातील दोन वर्षापासून फरार असलेल्या आरोपीच्या छत्रपती संभाजीनगर येथुन आवळल्या मुसक्या,


**आंबेगाव पोलीसांची कौशल्यपुर्ण कामगिरी.**

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

आंबेगाव (कात्रज )भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुरंन ११९/२०२३ भा.द.वि.क. ३०७,३२३, १४३,१४४, १४७, १४८, १४९ आर्म ॲक्ट कलम ४ (२५) म.पो. ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५, मोक्का ॲक्ट कलम ३ (१) (II) ३(२) ३(४) प्रमाणे दाखल गुन्हयातील मागील दोन वर्षापासुन फरार असलेला आरोपी नाव नवाज निसार सय्यद हा छत्रपती संभाजीनगर येथे असल्याबाबत आंबेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार पोहवा चेतन गोरे व हणमंत मासाळ यांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदरची माहीती वरिष्ठांना कळवुन त्यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे पोलीस अंमलदार चेतन गोरे, हणमंत मासाळ, राकेश टेकवडे असे दिनांक १७/०७/२०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे जावुन मिळालेल्या माहितीची शहानिशा करुन फरार आरोपी नाव नवाज निसार सय्यद याचा छत्रपती संभाजीनगर येथे शोध घेतला असता तो दिनांक १८/०७/२०२५ रोजी रात्री ०२:०० वाजता न्यु बायजीपुरा, मुसा चौक, जिन्सी, छत्रपती संभाजीनगर येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव नवाज निसार सय्यद, वय २३ वर्षे, काम व्यवसाय, रा. नबी अण्णा लाईन संतोषनगर, कात्रज, पुणे मुळ रा. पाशा भाई यांच्याकडे भाडयाने, न्यू बायजीपुरा, मुसा चौक, जिन्सी, छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगुन वर नमूद गुन्हा केल्याची कबुली दिली. सदर गुन्हयाचा तपास मा. श्री. राहुल आवारे, सहा पोलीस आयुक्त साो, स्वारगेट विभाग पुणे शहर हे करीत आहेत. सदरची कारवाई मा.श्री. अमितेश कुमार पोलीस आयुक्त साो पुणे शहर, मा.श्री. रंजन कुमार शर्मा पोलीस सह आयुक्त पुणे शहर, मा. श्री. राजेश बनसोडे अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे, मा. श्री. मिलींद मोहिते पोलीस उपआयुक्त परिमंडल-२ पुणे शहर व मा. श्री. राहुल आवारे सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शरद झिने आंबेगाव पोलीस स्टेशन यांचे सुचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) गजानन चोरमले, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर, तसेच पोलीस अंमलदार शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हणमंत मासाळ, निलेश जमदाडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, प्रमोद भोसले, नितीन कातुर्डे, योगेश जगदाळे, सुभाष मोरे, हरिश गायकवाड, अजय कामते, ज्ञानेश्वर चित्ते, राकेश टेकवडे, शिवाजी पोटोळे यांच्या पथकाने केली.

## शोषल मीडियावर सतर्क राहा, गोपनीय माहिती प्रसारित करणे टाळा-पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



**विंचूर** :- डिजिटल युगात सोशल मीडियाचा वापर वाढत असतानाच सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. बनावट प्रोफाइल, फसवणूक, ब्लॅकमेलिंग यांसारख्या घटनांपासून बचावासाठी नागरिकांनी सोशल मीडियावर अत्यंत सतर्क राहणे गरजेचे आहे, असे आवाहन पोलीस विभागाने केले आहे.

सामाजिक माध्यमे वापरतांना गोपनीय माहिती शेअर करणे टाळा, मोबाईल नंबर, पत्ता, ओळखपत्रांचे फोटो (आधार, पॅन) सोशल मीडियावर शेअर करू नयेत. प्रोफाइल सेटिंग 'फक्त मित्र' किंवा 'खाजगी' ठेवाव्यात. अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नयेत, तसेच त्यांच्याशी चॅट वा व्हिडीओ कॉल करताना खबरदारी घ्यावी. स्क्रीन रेकॉर्डिंगच्या माध्यमातून ब्लॅकमेलिंग होण्याची शक्यता असते.

फेक प्रोफाइलपासून सावध

खोट्या ओळखीच्या प्रोफाइलवर विश्वास ठेवू नये. अशा कोणत्याही संशयास्पद हालचाली तात्काळ रिपोर्ट कराव्यात. सायबर कायद्यांची माहिती असणे आणि सजग राहणे हीच सायबर सुरक्षिततेची गुरुकिल्ली असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**विद्यार्थ्यांसाठी सूचना**

शालेय विद्यार्थ्यांनी मोबाईल नंबर वा फोटो सार्वजनिक ठेवू नयेत. अनोळखी व्यक्तींशी संवाद टाळावा. कोणी गैरवर्तन केल्यास पालक किंवा शिक्षकांना त्वरित माहिती द्यावी.

बॉक्सः-

महिलांसाठी १०९१ ही विशेष हेल्पलाइन उपलब्ध आहे. सायबर गुन्ह्यांविरुद्ध तक्रार नोंदवण्यासाठी CYBERCRIME.GOV.IN या भारत सरकारच्या अधिकृत पोर्टलचा उपयोग करावा.

**भास्करराव शिंदे**
**स.पो.नि.लासलगाव पोलीस ठाणे**

## तळोजा कारागृहात कैद्यावर हल्ला, मुंबई बाम्बस्फोटातील आरोपींसह दोघांविरुध्द गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : तळोजा कारागृहात बंदीस्त असलेल्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचण आणि इरफान मुस्तफा लांडगे या दोघांनी मोक्कांतर्गत कैदेत असलेल्या गिरीश कुमारन नायर याच्यावर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सहाय्याने हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात नायर जखमी झाला आहे. या घटनेनंतर खारघर पोलिसांनी दोन्ही हल्लेखोर आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचण आणि इरफान मुस्तफा लांडगे तसेच जखमी गिरीष नायर असे तिघेही तळोजा कारागृहातील सर्कल - १ मधील वेगवेगळ्या बॅ रेकमध्ये बंदिस्त आहेत. १८ जुलै रोजी दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास सर्व कैदी बॅरेक क्रमांक - १ मध्ये असताना शामिल नाचण आणि इरफान लांडगे या दोघांनी जुन्या भांडणाच्या वादातून मोक्कातंर्गत कैदेत असलेला आरोपी गिरीश नायर याच्यावर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सहाय्याने हल्ला करुन त्याला जखमी केले. या हल्ल्यात कैदी गिरीष नायर गंभीररित्या जखमी झाल्याने कारागृह पोलिसांनी त्याला तत्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारानंतर पुन्हा त्याला कारागृहात आणण्यात आल्याची माहिती तळोजा कारागृहाचे अधीक्षक प्रमोद वाघ यांनी दिली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आरोपी शामिल नाचण आणि इरफान लांडगे या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही वाघ यांनी सांगितले.

# साप्ताहिक धम्मवर्ग चिपळूणच्या वतीने वर्षावास' संपन्न

दैनिक युवक आधार
चिपळूणः- (प्रमोद तरळ)

त्रिरत्न सहाय्यक गण, चिपळूण या धम्म संघटनेच्या वतीने साप्ताहिक धम्मवर्ग, चिपळूणच्या माध्यमातून नुकताच जिद्द गृहनिर्माण संस्था, पाग झरी, चिपळूण या कार्यालयात त्रिरत्न बौद्ध महासंघ, रत्नागिरी या धम्म संघटनेचे आदर्श प्रवचनकार धम्मचारी जिनरुची तथा प्रा. के. एस. सावरे सर यांच्या अधिपत्याखाली आषाढी पौर्णिमेच्या निमित्ताने अर्थात गुरुपौर्णिमा, संघ स्थापना दिन व ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेला वर्षावास प्रारंभ धम्म संस्कार सोहळा बुद्धवंदना,पूजापाठ,सूत्रपठणाने संपन्न झाला. त्रिरत्न सहाय्यक गण, चिपळूण ही गेली अनेक वर्ष धम्मचळवळी संबंधित कार्यरत आहे. या धम्म चळवळीच्या माध्यमातून आषाढी पौर्णिमा अर्थात गुरुपौर्णिमाचे औचित्य साधून वर्षावास प्रारंभ दिन साजरा करण्यात आला. बौद्ध धम्मात आषाढी पौर्णिमा म्हणजेच गुरुपौर्णिमेला अनन्य साधारण महत्त्व आहे. याच दिवशी भगवान बुद्धांनी आपले पहिले धर्मोपदेश (प्रथम प्रवचन)



आपल्या पंचवर्गीय भिक्षूंना सारनाथ येथे दिले. तसेच बुद्धाच्या संघाच्या सुरुवातीचा काळ किंवा स्थापना दिन म्हणून देखील या पौर्णिमेला महत्त्व आहे. या बौद्ध परंपरेतील धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने साप्ताहिक धम्मवर्ग,चिपळूणच्या माध्यमातून उपस्थित धम्ममित्र, उपासक, उपासिका यांनी धम्मचारी जिनरूची यांना गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता आषाढी पौर्णिमेचे (गुरुपौर्णिमेचे) आयोजन करण्यात आले होते.

यावेळी धम्मचारी जिनरुची यांनी उपस्थित धम्ममित्र, उपासक,उपासिकांना उपदेश करताना म्हणाले, गुरु पौर्णिमा ही गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा दिवस आहे. गुरु हा बौद्ध धर्मीय यांच्या जीवनातील शुद्ध साधनेच्या आरंभाचे मूळ स्वरूप आहे. भगवान बुद्ध हे केवळ बौद्ध धर्मीयांचे गुरु नसून अखंड विश्वातील मानव जातीकरीता सर्वोच्च विश्वगुरू म्हणून गणले जातात. पुढे धम्मचारी जिनरुचीनी आर्यसत्य,अष्टांगिक मार्ग, बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांचे स्पष्टीकरण करून बुद्ध पूजापाठ,शीलाचरण, ग्रंथपठन,चिंतन आणि धम्मदानाचे महत्त्व विशद करून सर्वांकरीता मंगल कामना व्यक्त केल्या.

धम्मचारी जिनरुची तथा प्राध्यापक के. एस. सावरे सर हे डी.बी.जे.महाविद्यालय चिपळूण येथे विज्ञान शाखेत कार्यरत असून त्यांचा सहाय्यक धम्ममित्र ते धम्मचारी हा प्रवास अत्यंत उदबोधक असून परिपूर्ण बौद्धधम्माच्या शिलाचरणावर आधारित आहे. या गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करताना गुरुपौर्णिमा वर्षावास प्रारंभ धम्मसंस्कार सोहळ्याकरिता धम्ममित्र प्रकाश पवार गुरुजी, धम्ममित्र सुनील शिवगण गुरुजी, धम्ममित्र अनंत हळदे (निवृत्त आरोग्य निरीक्षक, चिपळूण), धम्ममित्र सुनील गोतपागर (निवृत्त जेष्ठ अभियंता, मुंबई दूरदर्शन केंद्र), निवृत्त सुभेदार मेजर दत्ताराम मोहिते (अध्यक्ष, यशसिद्धी माजी सैनिक संघटना), ॲडव्होकेट विभावरी रजपूत (चेअरमन, जिद्द गृहनिर्माण संस्था, चिपळूण) आयु. प्रदीप मोहिते (निवृत्त उप महाव्यवस्थापक, महावितरण, कुडाळ), सामाजिक कार्यकर्ते धम्मबंधू सचिन मोहिते, अनिल मोहिते, प्रकाश सावंत, सुरेश जाधव (सचिव, जिद्द गृहनिर्माण संस्था, चिपळूण) आणि मातोश्री लक्ष्मीबाई कदम स्मृती मंच, खेरशेत या संघटनेचे मुख्य प्रवर्तक संजय शांताराम कदम आदि मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आपले धम्माप्रती व गुरुप्रती मनोगत प्रस्तुत केले. यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नशामुक्त भंडारा'साठी पोलिसांचा पुढाकार; 'जागर नशामुक्ती अभियाना'चा शुभारंभ

**प्रतिनिधी / भंडारा.**

भंडारा, : भंडारा जिल्ह्यात अंमली पदार्थांचा वाढता विळखा आणि त्याचे समाजावर होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने 'जागर नशामुक्ती अभियान' हाती घेतले आहे. या महत्त्वपूर्ण अभियानाचा शुभारंभ आज, दि. १९ जुलै २०२५ रोजी पोलीस अधीक्षक नूरुल हसन आणि जिल्हाधिकारी संजय कोलते यांच्या प्रमुख उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमात करण्यात आला. याप्रसंगी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक आणि मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणातून उपस्थितांना व्यसनाधीनतेच्या धोक्यांविषयी जागरूक केले. पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांनी सांगितले की, "अंमली पदार्थांचा विळखा समाजाला पोखरत असून, याविरोधात केवळ पोलीसच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने लढण्याची गरज आहे. हे अभियान केवळ एक सरकारी कार्यक्रम नसून, ही एक लोकचळवळ बनावी," असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी संजय कोलते यांनी






प्रशासनाच्या वतीने या अभियानाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. 'जागर नशामुक्ती अभियान' अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात वर्षभर विविध जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यामध्ये शाळा-महाविद्यालयीन स्तरावर निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धा, प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर जनजागृती रॅली आणि वॉकेथॉन आयोजित करून नशामुक्तीचा संदेश घरोघरी पोहोचवला जाईल. तरुणाईला आकर्षित करण्यासाठी 'सेल्फी विथ अँटी-ड्रग स्लोगन' सारखे अभिनव उपक्रम आणि सामूहिक शपथ ग्रहण कार्यक्रमांचाही यात समावेश आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश समाजाला, विशेषतः तरुण पिढीला, अंमली पदार्थांच्या धोक्यांपासून वाचवून एक निरोगी आणि सुरक्षित भंडारा जिल्हा घडवणे आहे. पोलिसांच्या या पुढाकारामुळे जिल्ह्यात व्यसनमुक्तीच्या चळवळीला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बंदिभागाच्या समस्या सोडवा जिल्हाधिकारी कडे निवेदन द्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड वार्ताहर**

मागील अनेक वर्षा पासून बंदिभाग हा विकास कामापासून कोसो दूर आहे अनेक लोकप्रतिनिधी निवडून आले मात्र विकास काम जसे च्या तसे आहेत रस्ते पाणी आरोग्य रोजगार सारख्या समस्या या भागात आहेत अनेक लोकप्रतिनिधी नी या भागाचा वापर मतदान पुरता केला या भागात अनेक गावात रस्ते आहेत की खडे आहेत पाण्याची रोजगार अनेक अधिकारी लोकांचे काम वेळेवर करून देत नाही वेळवर भेटत नाही या भागातील लोक शेतीवर अवलंबून आहेत या भागातील सहश्रकुंड पर्यटन स्थळ चा विकास करावा अशी मागणी निवेदन द्वारे जिल्हाधिकारी कडे मागणी केली




## सवाल करायला शिका, समस्या आपोआप संपतील" – गणेशदादा चव्हाण

**'चला महाराष्ट्र घडवूया' उपक्रमांतर्गत राठोडा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप**

**दैनिक युवक आधार**
**राठोडा (ता. परतूर, जि. जालना) –**

दिनांक १६ जुलै २०२५ रोजी राजे श्री शिवशाही समूह, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राठोडा येथे "चला महाराष्ट्र घडवूया" या उपक्रमांतर्गत होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गणेशदादा चव्हाण म्हणाले, "सवाल करायला शिका, समस्या आपोआप संपतील. आपण जर प्रश्नच विचारला नाही, तर उत्तर व समाधान आपल्याला मिळणारच नाही."

शैक्षणिक वाटचालीत येणाऱ्या अडचणींबाबत ते म्हणाले, "शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना अनेक अडचणी समोर येतात. यावर मात करण्यासाठी शिवशाही समूहातील शेकडो कामगारांची साथ आमच्याकडे आहे. प्राथमिक शिक्षणात खर्च तुलनेत कमी असला तरी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणासाठी जास्त आर्थिक गरज असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी शिक्षणात अडथळा येऊ न देता पुढे जावे, यासाठी आमचा संपूर्ण पाठिंबा राहील."

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गवळी सर होते. कार्यक्रमाला शा. व्य. स. अध्यक्ष डॉ. मिथुन जाधव, सौ. सारिकाताई चव्हाण, गणेश शेळके, प्रथमेश चव्हाण, सिद्धेश्वर दूधभाते, श्री. गुंजिटे सर, पठाण सर, बेवनाळे सर, रोळे मॅडम, जाधव मॅडम, शेख मॅडम, आवस्कर मॅडम, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सुनील कंटाळे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. शिंदे सर यांनी मानले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक उमेद, आत्मविश्वास व प्रेरणा जागवणारा ठरला.

# भटक्या जनावरांमुळे नागरिक त्रस्त, सहन करावा लागतो नाहक त्रास..

**दैनिक युवक आधार -**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात सध्या रस्त्यावर भटक्या जनावरांचा वावर खूप प्रमाणावर वाढला आहे, त्यामुळे वाहन चालकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, गुर मालकांना गुरांकडून काम करून घेऊन झालं की पावसाळ्यामध्ये गोठ्यात न बांधता असच मोकाट सोडून दिले जाते आणि पाऊस कमी झाला की पुन्हा त्यांना कामाला जुंपण्यासाठी घरी नेल जात , श्रीवर्धन समुद्र किनारी घोडागाडीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो तिकडे पण सारखच पाऊस पडला की त्या घोड्यांना मोकाट सोडले जाते त्यामुळे लोकांच्या शेतीचे वाडीचे खूप होत असते..अशा मतलबी माणसासाठी एकच म्हण लागू होते "माणसांपेक्षा मेंढर बरी"..अशा विचारसरणीच्या माणसांमुळे वाहनचालकांना आणि पादचारी माणसानं



त्याचा त्रास सहन करावा लागत आहे , रस्त्यावर असलेले भटक्या जनावरांमुळे अनेक अपघातसुद्धा झाले आहेत, प्रशासनाने भटक्या जनावरांचा लवकरच बंदोबस्त करावा आणि अशा मालकांच्या विरोधात योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी गेले अनेक वर्ष केली जात आहे पण प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे..

## एक जिल्हा एक उत्पादनात रत्नागिरीच्या आंब्याला सुवर्णपदक ;

**अधिकारी, कोकण हापूस विक्रेते संघाचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान**

**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी, (जिमाका)** : एक जिल्हा एक उत्पादनात देशात रत्नागिरी जिल्हा अव्वल ठरून हापूस आंब्याला सुवर्णपदकाचा मान मिळाला. हा मान मिळवून देण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी, हापूस विक्रेते संघानी प्रयत्न केले त्या सर्वांना प्रमाणपत्र देवून पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज गौरविले.*

जिल्हा उद्योग केंद्राचे माजी महाव्यवस्थापक प्रकाश हणबर, सध्याचे महाव्यवस्थापक अजिंक्य आजगेकर, संकेत कदम, कोकण हापूस विक्रेते संघाचे मिलिंद जोशी, जिल्हा



अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले, अमर देसाई, आनंद देसाई, श्रीकांत भिडे, विनोद हेगडे, शाहीद पिरजादे, अर्चना सकपाळ, आकाश म्हेत्रे, रविंद्र सूर्यवंशी, पूर्णांगी वायंगणकर, मुकुंद खांडेकर आदींना पालकमंत्री डॉ. सामंत यांनी प्रमाणपत्र दिले. जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनीही जिल्ह्याच्या या यशाबद्दल पालकमंत्र्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

*सफाई कामगारांना नियुक्तीपत्र*

लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा

## क्रीडा सह्याद्री क्लबच्या खेळाडूंची राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी..

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**



**निफाड** /- राष्ट्रीय मिनी फुटबॉल फाईव्ह स्पर्धा नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियम नाशिक येथे उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत क्रीडा सह्याद्रीच्या संघाने चमकदार कामगिरी बजावली. या स्पर्धेत क्रीडा सह्याद्री क्लबच्या च्या संघाने कर्णधार समर्थ कायस्थ, अथर्व जावरे, प्रसाद बडवर, संकप्ल पंडित, यशवंत अण्णा, चैतन्य गायकवाड, आदेश जंगम या खेळाडूंनी शानदार कामगिरी बजावली. या सर्व खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट खेळ केल्याबद्दल त्यांचे क्रीडा सह्याद्रीचे अध्यक्ष विलास गायकवाड व क्रीडा पुष्प देऊन अभिनंदन केले तसेच क्रीडा सह्याद्री सदस्य,राहुल कुलकर्णी, लखन घटमाळे,चेतन कुंदे,दत्तू रायते ,रमेश वडघुले ,प्रतीक्षा कोटकर ,विजय घोटेकर , कीर्ती कोटकर, श्याम चौधरी यांनी सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या . क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभत आहे.